cmyk

## संपादकीय

### लोकशाहीची चाड जपा!

खरं तर सध्याचा राजकारणाचा खालावलेला स्तर पाहता राजकीय पक्षांची विचारधारा, तत्त्व यांच्याशी काही संबंध उरलाय का? असा प्रश्न पडतो! सत्ताकारणासाठी कमरेचं काढून डोक्याला गुंडाळणाऱ्या राजकीय पक्षांनी आता तर या सत्ताकारणाचे एक नवे तत्त्वज्ञानच जन्माला घातले आहे व ते त्यांना विश्वासाने निवडून देणाऱ्या मतदारांच्या डोक्यावर थोपण्याचे प्रयत्नही अत्यंत निलटपणे चालविले आहेत.


दैनिक राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....








बीड – महाराष्ट्र | वर्ष – ०३ | अंक–२२० | शनिवार दि.०४ नोव्हेंबर–२०२३ | TC: MAHAMAR 50876 | पाने ४ | किंमत २ रूपये


# बोगस बियाणे कायद्याला कृषी सेवा केंद्रांचा विरोध

## राज्यभरात पुकारला संप, कंपनी जबाबदार असताना आमच्यावर कारवाई कशासाठी?



### » केंद्र चालकांवर एमपीडीए अंतर्गत कारवाई होणार

दरम्यान, प्रस्तावित विधेयकांनुसार सदोष बियाणे, खते यांच्या विक्रीवर केंद्र चालकांवर एमपीडीए अंतर्गत कारवाई होणार आहे. वास्तविक केंद्रांना कंपन्यांकडून मालाचा पुरवठा केला जातो. मालाच्या गुणवत्ता तपासणीसाठी कृषी विभागाचे स्वतःचे गुणनियंत्रक पथक असते. त्यामुळे व्यावसायिकांना दोषी धरण्याचे काहीही कारण नाही असे कृषी सेवा केंद्र चालकांनी म्हटले आहे.

### » पूर्वीच्या कायद्यात फक्त कंपनी जबाबदार

पूर्वीच्या कायद्यात खते, बी, बियाणे बोगस आढळल्यास कंपनीवर कारवाई केली जात होती. मात्र, नवीन कायद्यानुसार आता कृषी सेवा केंद्र चालकांवर देखील कारवाई करण्यात येणार आहे. कंपनीईतकेच याला कृषी सेवा केंद्र चालक देखील जबाबदार असणार आहेत.

**पुणे । प्रतिनिधी**

**एखादी निविष्ठा बोगस किंवा अवैध निघाली तर त्यात आमचा काय दोष. कंपनीनकडून त्या निविष्ठा आमच्याकडे आलेल्या असतात. त्यामुळं आमच्यावर कारवाई करण्याचे कारण काय? असा सवाल कृषी सेवा केंद्र चालकांनी केला आहे. बोगस, अवैध निविष्ठा विक्री प्रकरणात कृषी विक्रेत्यांनाही दोषी ठरवत त्यांच्याविरोधात नव्या कायद्याअंतर्गत कारवाई प्रस्तावित करण्यात आली आहे. मात्र, ही बाब अन्यायकारक असल्याचा आरोप कृषी सेवा केंद्र चालकांनी केला आहे. याविरोधात राज्यातील कृषी सेवा केंद्र २ ते ४ नोव्हेंबर असे सलग तीन दिवस बंद ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.**

राज्यात सध्या कृषी सेवा केंद्र चालकांचा संप सुरु आहे. हा संप २ नोव्हेंबर सुरु करण्यात आला आहे. राज्य सरकारनं केलेल्या कायद्याच्या विरोधात हा संप करण्यात येत आहे. राज्य सरकारने केलेल्या नवीन कायद्यात बोगस, अवैध निविष्ठा विक्री प्रकरणात कृषी विक्रेत्यांनाही जबाबदार धरण्यात येणार आहे. याविरोधात कृषी सेवा केंद्र चालक एकवटले आहेत.

प्रस्तावित विधेयक ४० ते ४४ अंतर्गत कायद्यातील जाचक नियम आणि अटी कृषी निविष्ठा विक्रेत्यांवर लादण्याचे प्रस्तावित आहे. हे प्रस्तावीत कायदे मागे घेण्याची मागणी कृषी सेवा केंद्र चालकांनी केली आहे. परंतु सरकारकडून त्याला प्रतिसाद मिळत नसल्याने पहिल्या टप्प्यात २ ते ४ नोव्हेंबर या कालावधीत राज्यातील सर्व कृषी सेवा केंद्र बंद ठेवण्याचा निर्णय घेतला आहे. बंदच्या काळात शेतकऱ्यांची गैरसोय होऊ नये यासाठी गरजेची खते, औषधे, बियाणे खरेदी करुन ठेवावी, असे आवाहनही कृषी सेवा केंद्र चालकांनी केले होते. दरम्यान, वेळोवेळी कृषी सचिव, आयुक्त, कृषिमंत्री धनंजय मुंडे यांना निवेदन देऊन या जाचक अटीमुळं व्यावसायिक आणि शेतकऱ्यांचे संभाव्य नुकसानाची माहिती दिली होती. मात्र, त्यात समाधानकारक तोडगा काढला नाही. त्यामुळे बंदचा निर्णय घेतल्याची माहिती काही कृषी सेवा केंद्र चालकांनी दिली आहे.

# चारा महागल्याने पशुपालक मेटाकुटीला



**पुणे । प्रतिनिधी**

**शेतीसाठी नैसर्गिक खत मिळावे या उद्देशाने पशुपालन केले जाते, परंतु आता कुक्कुटपालन, शेळीपालन, दुग्धव्यवसायदेखील स्वयंरोजगाराची चांगली संधी देत आहेत. युवा शेतकऱ्यांचा या व्यवसायाकडे कल आहे, परंतु पशुखाद्याचे वाढते दर आणि दुधाचे दर स्थिर असल्यामुळे व्यवस्थापनाच्या तुलनेत खर्च निघत नसल्याने जनावरे सांभाळणे कठीण होत आहेत. त्यामुळे पशुपालक मेटाकुटीला आला आहे.**

यंदा पावसाचे प्रमाण कमी झाल्याने पिकाची वाढ अपेक्षेप्रमाणे झालेली नाही. त्यातच उभ्या पिकात लष्करी अळी शिरल्याने शेतकऱ्यांचे हातचे पीक गेले. त्यामुळे जनावराच्या वैरणीच्या हिरव्या चाऱ्याचे दर गगनाला भिडले आहेत. जास्तीचे पैसे देऊनही चारा मिळत नसल्याने शेतकऱ्यांना दुभती जनावरे सांभाळण्यासाठी तारेवरची कसरत करावी लागते; तर काही शेतकरी जनावरे कवडीमोल दराने विकत आहेत. शिवाय, चाऱ्याचे दरही वाढत आहेत; मात्र गायी व म्हशीच्या दूध खरेदी दरामध्ये कोणतीही वाढ होत नाही. त्यामुळे दुग्धउत्पादक, शेतकरी वर्गातून नाराजी व्यक्त होत आहे. दिवसभरात एका दुभत्या जनावराला तीन वेळेला पोटभर चारा लागतो. कोरडी व हिरवी वैरण, सरकी पेंड, तसेच देखभालीसाठी माणसाचा खर्च दिवसाला पाचशे रुपयांपर्यंत येतो; मात्र एखादी गाय आठ लिटर दूध देत असेल तर त्यातून ४५० ते ४८० रुपये उत्पन्न मिळते. उर्वरित खर्च शेतकऱ्याला खिशातून करावा लागतो.

दुधाला चांगला भाव मिळायला हवा, तरच हा व्यवसाय टिकेल. दूध व्यावसायिकांना कर्ज, अनुदान मिळण्यासाठी सरकारने पुढाकार घेतला पाहिजे. पशुधनाची किंमत वाढत आहे. पशुखाद्यावरही सरकारचे नियंत्रण हवे. जनावरांसाठी वैरणीच्या चाऱ्याचा खर्च पाहता सद्यःस्थितीत दर शेतकऱ्यांना परवडणारे नाही. त्यामुळे दुभती जनावरे सांभाळणे पशुपालकांना अवघड झाले आहे. त्यामुळे दुग्धव्यवसाय करणे अडचणीचे ठरत आहे.


### शासनाने चारा अनुदान द्यावे

यंदा संकटाच्या मालिकेत अडकत गेलेल्या शेतकऱ्याला आता पशु चाऱ्याची चिंता लागली आहे. एकतर हातात पीक नाही, त्यात पाणी नाही आणि आता चाऱ्याची समस्या उभी राहिली आहे. शेतीने धोका दिल्याने शेतकऱ्यांना दुग्ध व्यवसाय आधार वाटतो आहे मात्र यंदा पाऊस न पडल्याने चाऱ्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. चाऱ्याचे भाव न परवडणारे आहेत. यामुळे पशुंना जगवायाचे कसे असा प्रश्न शेतकऱ्यांपुढे आहे. अशावेळी शासनाने पशू पालकांना चाऱ्यासाठी विशेष अनुदान द्यावे, अशी मागणी शेतकरी वर्गातून करण्यात येऊ लागली आहे.

## सदावर्तेंची हायकोर्टात याचिका

**मुंबई । प्रतिनिधी**

वकील गुणरत्न सदावर्ते यांनी मराठा आरक्षणाच्या आंदोलनाविरोधात २१६ पाणी याचिका उच्च न्यायालयात दाखल केली आहे. उच्च न्यायालयाने या याचिकेची ८ नोव्हेंबरला सुनावणी घेण्याचे निश्चित केले आहे. गृहविभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव, पोलीस महासंचालक ◄◄ पान २ वर

### चिकन भावफलक

NECC NATIONAL EGG CO-ORDINATION COMMITTEE

७८ रु.प्रति किलो

किरकोळ विक्रीचा दर (जिवंत)
१०६ रु.प्रति किलो

ड्रेस्ड (स्किनसह) दर
१२९ रु.प्रति किलो

अंड्याचा किरकोळ विक्रीचा दर
७४ रु.प्रति डझन


### बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड.

दि.०३ नोव्हेंबर २०२३

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| शेतमाल (आवक) | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू :४१.०० क्विंटल | २,५०२ | ५,९५० | ३,४६३ |
| ज्वारी/हायब्रिड : २२.०० क्विंटल | ३,५०१ | ४,८७० | ४,२३७ |
| मूग : २.०० क्विंटल | ५,४०१ | ९,४५१ | ७,४२६ |
| तूर : १.०० क्विंटल | १०,००० | १०,००० | १०,००० |
| उडीद : १.०० क्विंटल | ९,७०० | ९,७०० | ९,७०० |
| बाजरी: २३.०० क्विंटल | २,२०१ | ३,५१० | २,८३० |
| मका/ लोकल : ०.५० क्विंटल | २,१९० | २,१९० | २,१९० |
| सोयाबीन: ५५९.०० क्विंटल | ३,५०० | ४,८५० | ४,६९४ |
| हरभरा: १९.०० क्विंटल | ४,९५१ | ५,९६१ | ५,३४२ |

## तो हल्ला नियोजनबद्ध पद्धतीनेच-जयदत्त क्षीरसागर

**बीड । प्रतिनिधी**

**बीडमध्ये चार दिवसांपूर्वी मराठा आंदोलनाला हिंसक वळण लागले होते. त्यावेळी एका जमावाने माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांचे ऑफिस जाळले होते. तसेच आमदार संदीप क्षीरसागर यांचे घरही जाळले. क्षीरसागर कुटुंब हे बीड जिल्ह्याच्या राजकारणातील बडे प्रस्थ आहेत. असे असताना त्यांच्या घर आणि कार्यालयावर हल्ला झाल्याने खळबळ उडाली होती. याप्रकरणी जयदत्त क्षीरसागर यांनी शुक्रवारी प्रतिक्रिया दिली आहे. त्या दिवशी मनुष्यहानी झाली नाही अन्यथा बीडच्या इतिहासाला काळीमा फासणारी घटना घडली असती. हा हल्ला नियोजनबद्ध पद्धतीनेच करण्यात आला, असे ते म्हणाले.**



जयदत्त क्षीरसागर बोलताना म्हणाले की, पोलिस तपास सुरु असून आत्ताच त्याच्यावर भाष्य करणे उचित ठरणार नाही. या प्रकरणात कोण मास्टरमाईंड आहे, ते कळेलच. त्या दिवशी ऑफीस, गाडी, घराच्या समोर असलेल्या पाच ते सहा गाड्या जळण्यात आल्या. ऑफीसमध्ये तीन कर्मचारी होते. त्यांना जाळण्याचा प्रयत्न झाला. घरीसुद्धा सगळे कुटुंबिय घरात होते. एवढे सदस्य घरात असताना कोंडून मारण्याचा प्रयत्न आणि दगडफेक करण्यात आली. अशा प्रकारची घटना घडणं म्हणजे सामाजिक सुरक्षेलाच आव्हान देण्यासारखं आहे. अशा घटना घडत असतील आणि असे पायंडे पडत असतील तर कोण सुरक्षित आहे? मला वाटते की ही अतिशय चिंतनीय बाब आहे, असे ते म्हणाले. ◄◄ पान २ वर

# सेव्हन हिल्स हॉस्पिटल मुकेश अंबानींच्या घशात घालण्याचा डाव !

### मुंबई महानगरपालिका सेव्हन हिल्स हॉस्पिटल ताब्यात का घेत नाही, काँग्रेसच्या आरोपाने खळबळ

**मुंबई । प्रतिनिधी**

**मुंबईतील अंधेरी भागात असलेले सेव्हन हिल्स हे प्रशस्त व १५०० बेड्सचे रुग्णालय मुंबईकरांना वैद्यकीय सेवा पुरवण्यासाठी अत्यंत महत्वाचे ठरू शकते. आंध्र प्रदेशातील एक खासगी कंपनी हे रुग्णालय चालवत होती, पण ही कंपनी दिवाळखोरीत निघाल्याने हे रुग्णालय आता इतर खासगी कंपनीस चालवण्यास देण्याचा प्रयत्न सुरु आहे. सेव्हन हिल्स रुग्णालय खासगी कंपनीला चालवण्यास देण्याऐवजी स्वतः मुंबई महानगरपालिकेने चालवले पाहिजे पण तसे न करता हे हॉस्पिटल उद्योगपती मुकेश अंबानींच्या रिलायन्स कंपनीला देण्याचा घाट घातला जात आहे, असा गंभीर आरोप मुंबईचे माजी उपमहापौर व प्रदेश काँग्रेसचे सरचिटणीस राजेश शर्मा यांनी केला आहे.**




यासंदर्भात माहिती देताना काँग्रेस सरचिटणीस राजेश शर्मा म्हणाले की, सेव्हन हिल्स हॉस्पिटलमध्ये सध्या १५० बेड्स उपलब्ध असून त्यातील १२५ बेड्सच वापरले जात आहेत. या रुग्णालयात केसरी व पिवळे रेशनकार्ड धारक ७० रुग्णांवर दररोज किरकोळ उपचार केले जातात. एका पेशंटवर मुंबई महानगरपालिका ३० हजार रुपये खर्च ◄◄ पान २ वर

## सुप्रीम कोर्टात तारिख पे तारिख चालणार नाही!

### न्यायमूर्ती चंद्रचूड भडकले

**नवी दिल्ली । प्रतिनिधी**

**कोर्ट केस दरम्यान वेळकाढूपणाचे अनेक किस्से आपण ऐकलेले किंवा सिनेमातून पाहिलेले असतात. याच गोष्टीशी संबंधित अभिनेता सनी देओलचा तारिख पे तारिख हा डायलॉगही अनेकांनी ऐकला असेल. पण सध्या ही डायलॉग डिलिव्हरी केली आहे चक्क न्यायमूर्ती चंद्रचूड यांनी. वकिलांनी केसच्या दरम्यात सतत पुढच्या सुनावणीची तारीख कोर्टाकडून मागू नये. सुप्रीम कोर्टाला 'तारिख पे तारिख' अशी व्याख्या असलेलं कोर्ट बनवण्याची माझी अजिबात इच्छा नसल्याचं त्यांनी सांगितले.**



दिवसाच्या सुरुवातीच्या काही नव्या केसेसमध्ये वकिलांकडून सतत पुढील सुनावणीसाठी तारीख मागितली जाते. याबाबत बोलताना ते म्हणाले की, 'मागच्या दोन महिन्यात ३६८८ केसेसमध्ये वकिलांकडून स्थगितीचा प्रस्ताव दाखल केला गेला. न्यायमूर्तींच्या या खंडपीठात न्यायमूर्ती जे. बी पारदिवाला आणि मनोज मिश्रा हे देखील आहेत. ते म्हणाले, जोपर्यंत अत्यंत गरजेचे नसेल तोवर केसमध्ये स्थगिती आणू नये. न्यायमूर्ती पुढे म्हणाले की, वकिलांच्या संस्थांच्या मदतीने खालच्या न्यायालयात केस सुरू झाल्यानंतर नवीन खटले सूचीबद्ध करण्याच्या वेळांमधील अंतर कमी झालं आहे. यावेळी बोलताना ते म्हणाले, मी स्थगितीच्या अर्जावर लक्ष ठेवून आहे. एका दिवसात १७८ स्थगिती अर्ज आले आहेत. सप्टेंबर ते ऑक्टोबरच्या ◄◄ पान २ वर

# कुणबी नोंद शोधासाठी आता राज्यभर मोहीम

**मुंबई प्रतिनिधी**

मराठवाड्यात कुणबी नोंदी शोधण्यासाठी जी मोहीम राबविण्यात आली, त्याप्रमाणे आता संपूर्ण राज्यभर ही प्रक्रिया मिशन मोडवर राबविण्याचे निर्देश मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी विभागीय आयुक्त आणि जिल्हाधिकाऱ्यांना दिले. यासाठी निवृत्त न्यायाधीश संदीप शिंदे यांच्या अध्यक्षतेखालील समितीची कार्यकक्षा आता राज्यभर वाढविण्यात आली. विभागीय आयुक्त आणि जिल्हाधिकारी कार्यालयांमध्ये यासंदर्भात स्वतंत्र कक्ष स्थापन करण्याचे निर्देश देतानाच मराठा आरक्षणासंदर्भात कार्यवाहीच्या कामकाजाच्या प्रगतीचा अहवाल दर आठवड्याला संकेतस्थळावर अपलोड करण्यास मुख्यमंत्री शिंदे यांनी सांगितले.

या कामावर देखरेख ठेवण्यासाठी मंत्रालयस्तरावर अपर मुख्य सचिव दर्जाच्या अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्याचबरोबर मागासवर्ग आयोगाला इम्पॅरीकल डेटासाठी आवश्यक ती माहिती जिल्हाधिकाऱ्यांनी युद्धपातळीवर कार्यवाही करून महिन्याभरात ती उपलब्ध करून द्यावी, असे निर्देशही मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिले. 'वर्षा' निवासस्थानी मुख्यमंत्र्यांनी शुक्रवारी मुख्य सचिव मनोज सौनिक, सामान्य प्रशासन विभागाचे अपर मुख्य सचिव नितीन गद्रे, वित्त विभागाचे ◄◄ पान २ वर

# प्रधानमंत्री पीक विमा योजना: शेतकऱ्यांना सहभागाचे आवाहन

## » रब्बी हंगाम २०२३–२४ साठी मिळणार लाभ

**पुणे । प्रतिनिधी**

**प्रधानमंत्री पीक विमा योजना खरीप २०२३ ते रब्बी २०२५–२६ हंगामासाठी ३ वर्षासाठी अधिसूचित क्षेत्रातील अधिसूचित पिकांसाठी विमा क्षेत्र घटक धरुन राबविण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. त्यात शेतकऱ्यांनी आपला सहभाग नोंदवावा, असे आवाहन कृषी संचालक दिलीप झेंडे यांनी केले आहे.**

रब्बी हंगाम २०२३–२४ मध्ये या योजनेतील सहभाग हा कर्जदार तसेच बिगर कर्जदार शेतकऱ्यांना ऐच्छिक असून योजनेत सहभाग घेण्याची अंतिम मुदत रब्बी ज्वारी (बागायत व जिरायत) करिता ३० नोव्हेंबर, २०२३, गहू (बागायत), हरभरा, रब्बी कांदा करिता १५ डिसेंबर, २०२३ व उन्हाळी भात, उन्हाळी भुईमूग पिकाकरिता ३१ मार्च, २०२४ अशी आहे. त्यासाठी पीएमएफबीवाय ऑनलाईन पोर्टल कार्यान्वित करण्यात आले आहे. रब्बी हंगामामध्ये गहू (बागायत), रब्बी ज्वारी (बागायत व जिरायत), हरभरा, उन्हाळी भात, उन्हाळी भुईमूग व रब्बी कांदा ( ६ पिके ) या अधिसूचित पिकांसाठी, अधिसूचित महसूल मंडळ/ क्षेत्रात शेतकऱ्यांना सहभाग घेता येईल.

सन २०२३–२४ पासून ''सर्वसमावेशक पीक विमा योजना'' राबविण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे. त्या अनुषंगाने शेतकरी हिश्याची विमा हप्ता रक्कम राज्य शासनामार्फत भरण्यात येणार आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना केवळ १ रुपया भरून पोर्टल https://pmfby.gov.in वर स्वत: शेतकरी यांना तसेच बँक, विमा कंपनी प्रतिनिधी व सामूहिक सेवा केंद्र यांच्यामार्फत योजनेतील सहभागाची नोंदणी करता येईल.

प्रधानमंत्री पीक विमा योजनेत सहभागाची नोंदणीसाठी सामूहिक सेवा केंद्र धारकाला विमा कंपनीमार्फत प्रति अर्ज रक्कम रुपये ४० देण्यात येते. त्यामुळे शेतकऱ्यांनी सामूहिक सेवा केंद्र धारकाकडून केवळ १ रुपया भरुन पीक विमा योजनेत सहभागाची नोंदणी करावी. कर्जदार शेतकऱ्यांना योजनेत सहभागी होण्यासाठी कर्ज मंजूर करणाऱ्या बँकमार्फत योजनेत सहभागी होण्यासाठी विहित नमुन्यात अर्ज भरुन देणे आवश्यक आहे. कर्जदार शेतकरी योजनेत सहभागी होणार नसेल तर तसे त्याने विहित मुदतीत कर्ज मंजूर करणाऱ्या बँकेस लेखी कळविणे आवश्यक आहे.

योजनेतील सहभागासंदर्भात शेतकऱ्यांना अडचण तसेच सामूहिक सेवा केंद्राने अतिरिक्त रकमेची मागणी केल्यास आपल्या संबंधित पीक विमा कंपनीचे कार्यालय, नजिकची बँक, तहसीलदार/ तालुका कृषी अधिकारी, जिल्हाधिकारी/ जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी यांच्या कार्यालयाशी संपर्क साधावा. जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी या योजनेत सहभागी होऊन पिकाचा विमा काढण्याचे आवाहन कृषी संचालक झेंडे यांनी केले आहे.

### » योजना कार्यान्वयीन यंत्रणा पुढीलप्रमाणे

अहमदनगर, नाशिक, चंद्रपूर, सोलापूर, जळगाव, सातारा या जिल्ह्यांसाठी ओरिएन्टल इन्शुरन्स कं. लि., परभणी, वर्धा, नागपूर या जिल्ह्यांसाठी आयसीआयसीआय लोम्बार्ड जनरल इंशुरन्स कं.लि., जालना, गोंदिया, कोल्हापूर या जिल्ह्यांसाठी युनिव्हर्सल सोम्पो जनरल इं. कं. लि., नांदेड, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग या जिल्ह्यांसाठी युनायटेड इंडिया इन्शुरन्स कं. लि., छत्रपती संभाजीनगर, भंडारा, पालघर, रायगड या जिल्ह्यांसाठी चोलामंडलम एम. एस. जनरल इं. कं. लि., वाशिम, बुलडाणा, सांगली, नंदूरबार, बीड या जिल्ह्यांसाठी भारतीय कृषी विमा कंपनी, हिंगोली, अकोला, धुळे, पुणे, धाराशीव या जिल्ह्यांसाठी एचडीएफसी जनरल इं. कं. लि., यवतमाळ, अमरावती, गडचिरोली या जिल्ह्यांसाठी रिलायंन्स जनरल इन्शुरन्स, लातूर जिल्ह्यासाठी एस.बी.आय. जनरल इं.कं.लि. निवड करण्यात आली आहे.

cmyk

## अग्रलेख

# लोकशाहीची चाड ठेवा!

खरं तर सध्याचा राजकारणाचा खालावलेला स्तर पाहता राजकीय पक्षांची विचारधारा, तत्त्व यांच्याशी काही संबंध उरलाय का? असा प्रश्न पडतो! सत्ताकारणासाठी कमरेचं काढून डोक्याला गुंडाळणाऱ्या राजकीय पक्षांनी आता तर या सत्ताकारणाचे एक नवे तत्त्वज्ञानच जन्माला घातले आहे व ते त्यांना विश्वासाने निवडून देणाऱ्या मतदारांच्या डोक्यावर थोपण्याचे प्रयत्नही अत्यंत निलटपणे चालविले आहेत. आपल्या सत्ताकारणासाठीच्या कोलांटउड्या योग्य ठरवण्यासाठी सतत इतरांच्या कोलांटउड्याची आठवण जनतेला करून देत सडकून टीका करत राहायचे हा 'तेरे कमीजसे मेरी कमीज सफेद'चा फंडा सर्वच राजकीय पक्षांनी स्वीकारला आहे. या फंड्यातला 'मास्टर' कोण ठरणार? यासाठीचीच स्पर्धा आता सुरू आहे. महाराष्ट्रात सध्या सुरू असलेला सत्तासंघर्ष त्याचे ढळढळीत उदाहरण. याच सत्तासंघर्षातील शिवसेना व राष्ट्रवादी काँग्रेसच्या आमदार अपात्रता प्रकरणाच्या सुनावणीत अखेर सर्वोच्च न्यायालयालाच घटना, कायद्यांचे पावित्र्य जपायला हवे, याचे स्मरण करून द्यावे लागले. सर्वोच्च न्यायालयाने विधानसभा अध्यक्षांना त्यांच्या पदाच्या कर्तव्याची व घटनेचे पावित्र्य जपण्याच्या पदसिद्ध जबाबदारीची आठवण करून दिली.

लोकशाहीवर श्रद्धा ठेवणाऱ्या प्रत्येकाने सर्वोच्च न्यायालयाचे आभारच मानायला हवेत. विधानसभा अध्यक्षांच्या वतीने या प्रकरणाच्या सुनावणीचे जे सुधारित वेळापत्रक सर्वोच्च न्यायालयात सादर करण्यात आले ते सर्वोच्च न्यायालयाने फेटाळून लावले व या प्रकरणी विधानसभा अध्यक्षांकडून सुरू असलेल्या वेळकाढूपणावर बोट ठेवत तीव्र ताशेरेही ओढले. शिवसेनेच्या आमदारांबाबतचा निर्णय ३१ डिसेंबर २०२३ पूर्वी व राष्ट्रवादीच्या आमदारांबाबतचा निर्णय ३१ जानेवारी २०२४ पर्यंत घ्या, अशी डेडलाईनच घालून देताना सर्वोच्च न्यायालयाने 'हा विषय आता जास्त लांबवला जाऊ शकत नाही. दहाव्या परिशिष्टाचे पावित्र्य जपले पाहिजे', अशा शब्दांत नार्वेकरांना त्यांच्यावरील जबाबदारीची जाणीवही करून दिली. सर्वोच्च न्यायालयाच्या या कडक पवित्र्याने आता या प्रकरणाचा जो काही निकाल लागायचा तो मुदतीतच लागेल, अशी आशा निर्माण झाली आहे. अर्थात नार्वेकर यांनी काहीही निकाल दिला तरी तो ज्याच्या विरोधात जाईल तो गट निर्णयाविरोधात सर्वोच्च न्यायालयात जाणार, हे अगदी स्पष्ट आहे. त्यामुळे मतदारांना वा समर्थकांना 'चला एकदाचा गोंधळ संपला' म्हणून सुस्कारा टाकण्यासाठी पुन्हा सर्वोच्च न्यायालयातच या प्रकरणाची अंतिम तड लागण्याची प्रतीक्षा करावी लागणार आहे. मात्र, सर्वोच्च न्यायालयाच्या कडक पवित्र्यामुळे आता किमान या प्रकरणाची तड लागेल व विधानसभा निवडणूक मुदतपूर्व घेण्याचा फंडा सत्ताधाऱ्यांनी वापरला नाही तर, पुढील विधानसभा निवडणुकीपूर्वी या प्रकरणाचा निकाल लागेल, ही खात्री निर्माण झाली आहे. अशा प्रकरणांमध्ये लोकसभा वा विधानसभा अध्यक्षांनी निष्पक्षपणे निर्णय घेणे अपेक्षित असते. मात्र, पीठासीन अधिकारी बहुतांशवेळा सत्ताधारी पक्षाचेच सदस्य असल्याने नेहमी सत्ताधाऱ्यांना अनुकूल ठरणारी भूमिका घेतात. याचा अनुभव यापूर्वीही अशा प्रकरणांमध्ये वारंवार आलेला आहेच. शेवटी सर्वोच्च न्यायालयालाच त्यावर निर्णय घ्यावा लागतो, हाच अनुभव आहे. महाराष्ट्रातील सत्तासंघर्षातही त्याचीच पुनरावृत्ती होत असताना सर्वोच्च न्यायालयाने कडक पवित्रा घेऊन कालमर्यादा ठरवून दिली हे योग्य झाले. मात्र, पक्षांतर बंदीच्या परिशिष्ट दहाचा देशातल्या सर्वच राजकीय पक्षांतील सदस्यांनी जो पोरखेळ करून टाकलाय तो पाहता हा कायदाच निष्प्रभ झाल्याचा अनुभव वारंवार येतो. त्यामुळे हा कायदा प्रभावी करण्यासाठी पीठासीन अधिकाऱ्यास कायद्यानेच कालमर्यादेचे बंधन घातले जाणे आवश्यक आहे. अशी कालमर्यादा असेल तरच या कायद्याचे पावित्र्य खऱ्या अर्थाने जपले जाईल व या कायद्याचा वचकही निर्माण होईल. त्यामुळे सर्वोच्च न्यायालयाने केवळ पावित्र्य जपा असा सल्ला देऊन न थांबता असे पावित्र्य जपण्यासाठी आवश्यक कालमर्यादेचे बंधन कायद्यात समाविष्ट करण्यासाठी केंद्र सरकारला सुधारणेचे निर्देश देणे आवश्यक आहे. सर्वोच्च न्यायालय या प्रकरणाच्या अनुषंगाने केंद्र सरकारला तसे निर्देश देणार का? याचीच प्रतीक्षा या प्रकरणाचा निकाल दिला जाताना असणार आहे. अध्यक्षांवर कालमर्यादेचे बंधन घातल्यास तो चुकीचा पायंडा पडेल आणि विविध राज्यांतील उच्च न्यायालये विधानसभा अध्यक्षांना ठराविक काळात निर्णय घेण्याचे आदेश देतील, असा युक्तिवाद करत सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांनी कालमर्यादेच्या बंधनास असणारा सत्ताधाऱ्यांचा विरोध दाखवूनच दिला आहे व तो अजिबात अनपेक्षितही नाही! सत्तेवर असणाऱ्यांसाठी पक्षांतर बंदी कायदा कायम सत्ता टिकवण्यासाठी, मिळवण्यासाठी वा मजबूत करण्यासाठी अडकाठीच ठरला आहे. त्यामुळे या कायद्याच्या प्रभावी अंमलबजावणीस सत्तेवर असणाऱ्यांचा विरोध अपेक्षितच! मात्र, तो एकंदर परिस्थिती पाहता ऱ्हस्व दृष्टीचाच ठरतो. कारण कुठलाच राजकीय पक्ष सत्तेचा अमरपट्टा घेऊन आलेला नाही. सत्ताकारणासाठी सत्ताधारी पक्ष म्हणून आज जे तुम्ही करताय तेच विरोधक म्हणून बसल्यावर उद्या तुमच्यासोबतही घडणारच आहे, एवढा राजकीय शहाणपणा सर्वच राजकीय पक्षांच्या प्रमुखांमध्ये व 'थिंक टँक' मध्ये नक्कीच असेल. तेव्हा खरं तर सर्वच राजकीय पक्षांच्या प्रमुखांनी न्यायालयाच्या आदेशाची वा निर्देशाची प्रतीक्षा न करता पक्षांतर बंदी कायदा प्रभावी व कडक करण्यासाठी पुढाकार घ्यायला हवा. पक्षांतर करणारे लोकप्रतिनिधी केवळ आपल्या पक्षाशीच गद्दारी करत नाहीत तर त्यांना विश्वासाने निवडून देणाऱ्या मतदारांचीही प्रतारणा करतात, विश्वासघात करतात, हे सर्वच राजकीय पक्षांनी लक्षात घ्यायला हवे. मतदारांचा वारंवार होणारा असा विश्वासघात ना राजकीय पक्षांच्या भल्याचा, ना लोकशाहीच्या! त्यामुळे सर्वोच्च न्यायालयाने या प्रकरणापुरता नार्वेकरांना 'पावित्र्य जपा' असा सल्ला दिला असला तरी दीर्घकालीन विचार करता तो केवळ पीठासीन अधिकाऱ्यांनाच नव्हे तर सर्वच राजकीय पक्षांच्या प्रमुखांनाही तेवढाच लागू होतो. त्यामुळे जर राजकीय पक्षांना खरोखरच या कायद्याची चाड असेल तर त्याचे पावित्र्य जपण्याची जबाबदारी सर्वच राजकीय पक्षांवर येते हे त्यांनी लक्षात घेण्याची गरज आहे.

## पान १वरून...

### सेव्हन हिल्स हॉस्पिटल मुकेश

करते हे लक्षात घेता महिन्याला ९ कोटी रुपये खर्च केला जातो. संपूर्ण १५०० खाटांची रुग्णसेवा सुरु करायची असल्यास महापालिकेला वर्षाला ४५० कोटी रुपयांचा खर्च येऊ शकतो. मुंबईच्या लोकसंख्येचा विचार करता मुंबई महानगरपालिकेनेच हे रुग्णालय ताब्यात घेऊन केईएम, नायर, सायन हॉस्पिटलप्रमाणे सुरु ठेवले तर मुंबईकरांसाठी अत्यंत फायद्याचे ठरु शकते. पुढे बोलताना काँग्रेस सरचिटणीस राजेश शर्मा म्हणाले, सेव्हन हिल्स हॉस्पिटल हे अंधेरीत मोक्याच्या जागी १६ एकर जागेवर आहे, १५०० बेड्सची क्षमता आहे, बाजारभावानुसार या जागेचे ३ हजार ते ४ हजार कोटी रुपये मुल्य होते. हॉस्पिटलच्या शिल्लक असलेल्या जागेत मेडीकल कॉलेज, नर्सिंग कॉलेज सुरु करता येऊ शकते. एम्स सारखे सर्व वैद्यकीय सुविधांनीयुक्त असे हॉस्पिटल होऊ शकते. कोवीड काळात याच रुग्णालयात ६० हजार पेशंटवर उपचार करण्यात आले आहेत. हे रुग्णालय खासगी कंपन्यांना देण्याचा राज्य सरकार व मुंबई महानगरपालिकेचा प्रयत्न असून इच्छुक कंपन्यांमध्ये मुकेश अंबानी यांच्या कंपनीचाही समावेश आहे. सेव्हन हिल्स रुग्णालय मुंबई महानगरपालिकेने ताब्यात घ्यावे यासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि मुंबई महानगरपालिकेचे आयुक्त इक्बाल चहल यांना याआधीही पत्र पाठविले होते पण मुख्यमंत्री शिंदे अथवा आयुक्त चहल यांच्याकडून प्रतिसाद मिळाला नाही. राज्य सरकार व मुंबई महापालिकेचा थंड प्रतिसाद पाहता हे रुग्णालय उद्योगपती मुकेश अंबानी यांच्या घशात घालण्याचा प्रयत्न असल्याचे दिसते असा आरोप त्यांनी केला आहे.

----------

### कुणबी नोंद शोधासाठी

अपर मुख्य सचिव नितीन करीर, महसूल विभागाचे अपर मुख्य सचिव राजगोपाल देवरा, सामाजिक न्याय विभागाचे सचिव सुमंत भांगे यांची बैठक घेतली. मराठा आरक्षणासाठी उपोषण करणारे मनोज जरांगे यांच्या समवेत राज्य शासनाच्या शिष्टमंडळासोबत झालेल्या चर्चेतील मुद्यांवर सविस्तर चर्चा झाली. यावेळी राज्यातील विभागीय आयुक्त आणि जिल्हाधिकारी दूरदृष्यप्रणालीच्या माध्यमातून सहभागी झाले होते. मुख्यमंत्र्यांनी कुणबी नोंदी तपासणीच्या कामाचा आढावा घेतला. आता मराठवाड्यासह राज्यातील उर्वरित जिल्ह्यांमध्ये जिल्हाधिकाऱ्यांनी स्वत:हून कुणबी नोंदी तपासण्यासाठी युद्धपातळीवर मोहीम हाती घ्यावी. त्यासाठी उपजिल्हाधिकारी दर्जाचा अधिकारी आणि त्यांच्या नियंत्रणाखाली कर्मचाऱ्यांची उपलब्धता करून द्यावी. त्यांना आवश्यक ते मनुष्यबळ, साधनसामुग्रीदेखील तातडीने देण्याचे निर्देश मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिले. मंत्रालयस्तरावर अपर मुख्य सचिव नितीन गद्रे, मुख्यमंत्री कार्यालयाचे प्रधान सचिव विकास खारगे, विभागीय स्तरावर विभागीय आयुक्त आणि जिल्हास्तरावर जिल्हाधिकारी याबाबत संनियंत्रण करतील, असे मुख्यमंत्री शिंदे यांनी सांगितले.

मराठा आरक्षणासंदर्भात प्रशासन दोन पातळीवर काम करीत असून राज्यभर कुणबी नोंदी तपासण्याची कार्यवाही सुरू करतानाच दुसरीकडे राज्य मागासवर्ग आयोगाला इम्पीरीकल डेटा जमा करण्यासाठी आवश्यक ती माहिती जिल्हाधिकाऱ्यांनी तातडीने सादर करावी, असेही त्यांनी सांगितले. त्यासाठी संस्थांची मदत घेण्याचे निर्देश दिले.

-----------------------

### सुप्रीम कोर्टात तारिख पे

कालावधीत दिवसाकाठी सरासरी १५० स्थगिती अर्ज येत असतात. खंडपीठासमोर सूचीबद्ध झाल्यानंतर वकील स्थगिती अर्ज देतात. यामुळे बाहेरच्यासाठी हा एक चुकीचा संकेत जातो.'

--------------

### सदावर्तेंची हायकोर्टात

महाराष्ट्र राज्य, मुंबई पोलीस आयुक्त, भोईवाडा पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक, पोलीस अधीक्षक जालना, गोंडीचे पोलीस निरीक्षक, सीबीआय महासंचालक, राज्य सरकार आणि मनोज जरांगे पाटील यांना याचिकेत प्रतिवादी करण्यात आले आहे. या याचिकेत सदावर्तेंनी गंभीर आरोप केले आहेत.

महाराष्ट्र अशांत करून जातीय तेढ वाढविण्याचा प्रयत्न सुरु आहे. शरद पवार आणि उद्धव ठाकरेंचा जरांगेंच्या आंदोलनापाठी असल्याचा आरोप सदावर्तेंनी केला आहे. एसटी महामंडळाच्या अनेक बसेसचे मोठे नुकसान राज्यभर जाळपोळ करून करण्यात आले आहे. सदर कर्मचाऱ्यांना त्या दिवसांचा पगारही मिळालेला नाही. त्याचबरोबर अनेक ठिकाणी शाळा महाविद्यालय आणि इतर आस्थापनांवर या हिंसेचा परिणाम झाला. अनेक ठिकाणी जबरदस्तीने बंद करण्यात आले जीडीपीचे मोठे नुकसान झाले. त्याचबरोबर महाराष्ट्रात दळणवळणावर परिणाम झाला. गंभीर स्वरूपाचे दाखल गुन्हे मागे घ्या ही सुद्धा अनिष्ट मागणी करण्यात आली, असे मुद्दे या याचिकेत त्यांनी मांडले आहेत.

मालमत्तांचे नुकसान करणाऱ्यांकडून वसुली करण्यात आलेली नाही. त्यासोबतच ३०७ सारखे गुन्हे जे गंभीर अपराधाचे आहेत. सदर गुन्हे वापस घेण्याचे अधिकार सरकारला देखील नाहीत. त्याचबरोबर माननीय सर्वोच्च न्यायालय आणि उच्च न्यायालयाने देखील अनेक वेळेस अशा गंभीर अपराधातील लोकांविरुद्ध कारवाई न करण्याबाबत निरीक्षण नोंदवलेली आहेत, असे सदावर्ते आपल्या याचिकेत म्हटले आहे.

-----------

# दिल्लीत वायु प्रदूषणाने लोकांचे हाल, हवा गुणवत्ता निर्देशांक ४०० च्या पुढे

**नवी दिल्ली । वृतसंस्था**

**राजधानी दिल्लीतील हवेची गुणवत्ता 'अत्यंत वाईट' श्रेणीत पोहोचल्याने दिल्ली सरकारची प्रदूषण नियंत्रणासाठी धावाधाव सुरू झाली आहे. याअंतर्गत दिल्लीतील अनावश्यक बांधकामांवर बंदी घालण्यात आली आहे. तसेच सर्व शाळांमध्ये दोन दिवसांची सुटीही देण्यात आली आहे. यासोबतच, प्रवासासाठी खासगी वाहने टाळून सार्वजनिक वाहनांचा वापर करावा, असे आवाहनही दिल्ली सरकारने केले आहे.**



दिल्लीतील हवा गुणवत्ता निर्देशांक काही ठिकाणी ४०० च्या पुढे गेला आहे. श्रेणी प्रतिसाद कृती कार्यक्रम ३ नुसार नियमावलीसह काही निर्बंध दिल्ली आणि राष्ट्रीय राजधानी परिसरात लागू करण्यात आले आहे. दिल्लीतील शाळांना देखील दोन दिवसांची सुट्टी जाहीर केल्याची माहिती दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांनी दिली आहे. दिल्लीतील हवा गुणवत्ता निर्देशांक काही ठिकाणी ४०० च्या पुढे गेला आहे. वायू प्रदूषणाला आळा घालण्यासाठीच्या उपाययोजनांचा भाग म्हणून आवश्यकता नसल्यास स्वतःची वाहने रस्त्यावर उतरवू नयेत, जास्तीत जास्त सार्वजनिक वाहतूक पर्यायांचा वापर करावा, आजूबाजूला किंवा तुमच्या परिसरात आग लागल्याचे निदर्शनास आल्यास ग्रीन दिल्ली ॲपवर सूचित करावे, असे आवाहन दिल्लीचे पर्यावरण मंत्री गोपाल राय यांनी केले आहे. आताची परिस्थिती पाहता शनिवारपर्यंतचे निर्देश देण्यात आले आहे. रविवारच्या सुट्टीनंतर सोमवारची परिस्थिती पाहुन नवे निर्देश सोमवारी देण्यात येतील, असेही ते म्हणाले. सार्वजनिक वाहतुक व्यवस्थेत बसेसच्या २४०० फेऱ्या वाढवण्यात आल्या आहेत. शटल बस सेवा सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. दोन मार्गावर ही सेवा सध्या सुरू आहे. यामुळे सरकारी कर्मचारी वर्गाने या माध्यमाद्वारे प्रवास करावा, दिल्ली मेट्रोच्या ६० अतिरिक्त फेऱ्या सुरू करण्यात आल्या आहेत. त्यामुळे लोकांनी वैयक्तिक वाहनांनी प्रवास न करता या माध्यमातून जास्तीत जास्त प्रवास करावा असे आवाहन मंत्री गोपाल राय यांनी केले आहे केले आहे.

एकीकडे दिल्लीतील वायू प्रदूषण नियंत्रणात आणण्याचे आव्हान सरकारसमोर असताना स्मॉग टॉवरवरून आरोप प्रत्यारोप सुरू झाले आहेत. दिल्लीतील स्मॉग टॉवर बंद असल्याच्या कारणावरून दिल्ली सरकारमधील पर्यावरण मंत्री गोपाल राय यांनी केंद्र सरकार आणि संबंधीत यंत्रणांना धारेवर धरले आहे. केंद्र सरकारच्या अखत्यारीत येत असलेल्या यंत्रणानी परस्पर निर्णय घेतल्यामुळे स्मॉग टॉवर बंद असल्याचे त्यांनी म्हटले आहे. तर दिल्लीतील काही ठिकाणी हवा गुणवत्ता निर्देशांक ७०० पेक्षा जास्त आहे. मात्र दिल्लीतील कॅनॉट प्लेस भागातील स्मॉग टॉवरला दिल्ली सरकारने टाळे ठोकले आहे. दिल्ली सरकार प्रदूषण नियंत्रण कमी करण्यात सपशेल अपयशी ठरले आहे, दिल्लीला गॅस चेंबर बनवले गेले आहे, अशी घणाघाती टीका भाजप प्रवक्ते शेहजाद पुनावाला यांनी केली आहे.

# वॉटरपोलोमध्ये महाराष्ट्र पुरूष संघ २६ वर्षांनी अंतिम फेरीत

**पणजी । वृतसंस्था**

**महाराष्ट्र संघाने पश्चिम बंगाल संघावर १६–४ असा दणदणीत विजय नोंदवला आणि वॉटरपोलोमधील पुरुष गटात अंतिम फेरी गाठली. राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत तब्बल २६ वर्षांनी महाराष्ट्र संघ अंतिम फेरीसाठी पात्र ठरला आहे. महाराष्ट्राच्या महिला संघाला मात्र उपांत्य फेरीत पराभव स्वीकारावा लागला. त्यामुळे त्यांना आता कांस्यपदकासाठी खेळावे लागणार आहे.**

पुरुषांच्या उपांत्य फेरीत अरुण मिश्रा यांच्या मार्गदर्शनाखाली उतरलेल्या महाराष्ट्राने सुरुवातीपासूनच पश्चिम बंगाल विरुद्ध वर्चस्व गाजवले. महाराष्ट्रकडून सारंग वैद्य व उदय उत्तेकर यांनी प्रत्येकी चार गोल केले तर गौरव महाजनी व पियुष सूर्यवंशी यांनी प्रत्येकी दोन गोलांची नोंद केली. अंतिम फेरीत महाराष्ट्रास सेनादल संघाबरोबर खेळावे लागणार आहे. महिलांच्या उपांत्य फेरीत महाराष्ट्राला केरळ संघाने १६–७ असे सहज पराभूत केले. शनिवारी सकाळी होणाऱ्या तिसऱ्या क्रमांकाच्या लढतीत महाराष्ट्राची कर्नाटक संघाची गाठ पडणार आहे. त्यानंतर पुरुष गटाचा अंतिम सामना होणार आहे. दरम्यान, महाराष्ट्राच्या ऋतिका श्रीरामने डायव्हिंगमध्ये एक मीटर स्प्रिंग बोर्ड प्रकारात रौप्यपदक जिंकताना पदकांची हॅट्ट्रिक पूर्ण केली. तिने १५१ गुण नोंदवले. या स्पर्धेमध्ये तिने या अगोदर एक रौप्य व एक कांस्यपदक जिंकले होते. ऋतिका ही सोलापूरची खेळाडू असून तिचे पती हरिप्रसाद हेदेखील आंतरराष्ट्रीय डायव्हिंगपटू आहेत. रेल्वेमध्ये नोकरी करणाऱ्या ऋतिकाला तीन वर्षांचा मुलगा असूनही ती नियमितपणे राष्ट्रीय स्पर्धांमध्ये भाग घेत आहे. दोन वर्षांपूर्वी तिला राष्ट्रीय स्पर्धेत तीन सुवर्णपदके मिळाली होती तर गतवर्षी गुजरातमध्ये झालेल्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेतील दोन सुवर्ण व एका कांस्यपदकाची कमाई केली होती.

# आमदार आमच्या सोबत आल्याने सुप्रिया सुळेंना नैराश्य – तटकरे

**मुंबई । प्रतिनिधी**

**खासदार सुप्रिया सुळे यांनी लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांना पत्र लिहिले आहे. खासदार सुनील तटकरे यांचे तात्काळ निलंबन करा, अशी मागणी खासदार सुप्रिया सुळे यांनी केली आहे. या याबाबत सुनील तटकरे यांनी मोठ्या संख्येने आमदार आमच्या सोबत आल्याने सुप्रिया सुळेंना नैराश्य आले आहे, असे म्हटले आहे.**



परिशिष्ट दहा नुसार पक्षविरोधी कृती केल्याने सुनील तटकरे यांच्यावर कारवाई करावी अशी पत्राच्या माध्यमातून सुप्रिया सुळेंनी लोकसभा अध्यक्षांना विनंती केली आहे. या याबाबत सुनील तटकरे यांनी प्रतीक्रिया दिली आहे. माध्यमांशी बोलताना ते म्हणाले की, मोठ्या संख्येने आमदार आमच्या सोबत आल्याने सुप्रिया सुळेंना नैराश्य आले आहे. आम्ही सुद्धा पिटीशन दाखल केली असून आमची सुद्धा तीच मागणी असल्याचे त्यांनी म्हटले आहे. तटकरे म्हणाले की, आम्ही सुद्धा पिटीशन दाखल केली आहे. संसदरत्न, श्रीनिवास पाटील आणि फौजिया खान यांच्याबाबत पिटीशन दाखल केली आहे. आमचे देखील तेच म्हणणे आहे. आम्ही लोकशाहीच्या मार्गाने पिटीशन दाखल केली. संसदरत्न नेहमीच अदृश्यशक्ती असा उल्लेख केला आहे. मोठ्या संख्येने आमदार आमच्यासोबत आल्याने त्यांना नैराश्य आले असेल. शपथविधीच्या दिवशी अमोल कोल्हे आमच्या सोबत होते. त्यांनी पहिल्या दिवशी आम्हाला समर्थन दिले, असे सुनिल तटकरे म्हणाले.

# देशात बेरोजगारीचा उच्चांक!

**नवी दिल्ली । वृतसंस्था**

**पतंप्रधान नरेंद्र मोदींनी देशाला ५ ट्रिलियन अर्थव्यवस्थेचे स्वप्न दाखवलं असून जागतिक स्तरावर भारताची मोठी प्रगती होत असल्याचं म्हटलं आहे. त्या अनुषंगाने सातत्याने रोजगार निर्मित्ती आणि पायभूत सुविधांच्या माध्यमातून विकास होत असल्याच दावाही मोदी सरकारकडून करण्यात येतो. मात्र, देशातील बेरोजगारी दरात वाढ झाली असून गत वर्षात बेरोजगारी दराने उच्चांक गाठल्याचे एका सर्वेक्षणाच्या अहवालातून समोर आले आहे. राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी यासंदर्भात ट्विट करुन मोदी सरकारवर निशाणा साधला. तसेच, भाजपकडून होत असलेला दावा खोटा ठरतो आहे, असेही त्यांनी म्हटले आहे.**



अमेरिकेसारख्या इतर विकसित अर्थव्यवस्थांमध्ये सकल देशांतर्गत उत्पादनाच्या ८% ते ९% च्या तुलनेत भारतात लॉजिस्टिक खर्च सकल देशांतर्गत उत्पादनाच्या १३% ते १४% इतका जास्त आहे, अशी माहिती केंद्रीयमंत्री नितीन गडकरी यांनी एका कार्यक्रमात दिली होती. तसेच, पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या ५ ट्रिलियन इकॉनॉमिचे स्वप्न साकार होईल, असेही त्यांनी म्हटले होते. तर, पंतप्रधान मोदी हेही सातत्याने जाहीर कार्यक्रमांतून आणि सभांमधून भारत २०२५ मध्ये ५ ट्रिलियन इकॉनॉमिचे स्वप्न साकार करेल, असा दावा करताना दिसून येतात. एकीकडे ५ ट्रिलियन इकॉनॉमिचा दावा केला जात असताना दुसरीकडे देशातील बेरोजगारीचा दर वाढला आहे. त्यावरुन, जयंत पाटील यांनी मोदी सरकार व भाजपला लक्ष्य केले आहे. एकीकडे देशात वेगवेगळ्या राज्यातील निवडणुकांचा प्रचार शिगेला पोहोचला आहे, सत्ताधारी पक्षाचे नेते प्रचारात आकंठ बुडाले आहेत, दुसरीकडे मात्र भारतातील बेरोजगारी देखील शिगेला पोहचली असून देशातील युवा बेरोजगारीच्या नैराश्यात आकंठ बुडाला आहे. सेंटर फॉर मॉनिटरींग इकोनॉमीच्या नुकत्याच प्रसिद्ध अहवालानुसार देशातील बेरोजगारीचा दर गेल्या दोन वर्षांतील उच्चांकी म्हणजे १०.९ टक्क्यांवर पोहोचला आहे अशी माहिती पाटील यांनी दिली. एकीकडे देशाची अर्थव्यवस्था वाढत असल्याचा दावा केला जात असताना दुसरीकडे मात्र बेरोजगारी देखील वाढत आहे. हे चित्र विरोधाभासी आहे. बेरोजगारी वाढत असल्याने देशाची अर्थव्यवस्था वाढत असल्याचा केंद्र सरकार व भाजपा नेत्यांचा दावा सपशेल खोटा ठरत आहे, असे पाटील यांनी म्हटले. पाटील यांनी भाजपवर थेट हल्लाबोल करत देशातील बेरोजगारीच्या मुद्द्याकडे लक्ष वेधले आहे.

# डॉ.ओमप्रकाश शेटे यांना केंद्रातून महाराष्ट्रात पाचारण

## राज्यातल्या आयुष्यमान भारत मिशनच्या प्रमुखपदाची सुत्रे



बीड/प्रतिनिधी

राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्यांचे विश्वासू डॉ.ओमप्रकाश शेटे यांना केंद्रातून परत महाराष्ट्रात पाचारण केले आहे. केंद्र सरकारच्या आयुष्मान भारत योजनेद्वारे राज्यात 'आयुष्यमान भारत मिशन महाराष्ट्र' हे अभियान नवनिर्मित करून त्याच्या कक्षप्रमुख पदाची धुरा डॉ. शेटे यांच्या खांद्यावर देण्यात आली आहे. मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता कक्ष व केंद्रीय आरोग्य राज्यमंत्र्यांचे सहाय्यक खासगी सचिव म्हणून केलेल्या अनुभवाची व पुण्याईची शिदोरी गाठीशी असलेल्या ओमप्रकाश शेटे यांच्याकडून सर्वसामान्य व गरजवंत रुग्णांच्या खुप मोठ्या अपेक्षा आहेत.

भाजपा सरकारच्या कार्यकाळात मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता कक्षाच्या माध्यमातून फडणवीस सरकारची सामाजिक प्रतिमा घराघरात पोहोचवण्याचे काम या कक्षाने केले होते. केवळ साडेचार वर्षात दिवसरात्र काम करत डॉ. ओमप्रकाश शेटे यांनी महाराष्ट्राच्या इतिहासातील सर्वात जास्त निधी सर्वसामान्य रुग्णांच्या उपचारासाठी पोहोचवण्याचे काम केले होते. तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा 'रुग्णसेवेचा' संदेश घेऊन राज्यभर आरोग्य शिबीरे भरवली होती. अतिशय दुर्गम व नक्षलग्रस्त भागात सरकारची रुग्णसेवा पोहोच केली होती. तत्कालीन मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता कक्षाचे प्रमुख राहिलेले डॉ.ओमप्रकाश शेटे हे सध्या केंद्र सरकारच्या आरोग्य मंत्रालयामध्ये सहाय्यक सचिव म्हणून कार्यरत आहेत. मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता कक्षात असताना धर्मादाय व महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेचे सदस्य म्हणून देखील त्यांनी काम पाहिलेले आहे. त्यांच्या कार्यकाळामध्ये मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता व धर्मादाय आणि महात्मा फुले योजनेतील लाभार्थ्यांना करोडो रुपयांचा लाभ झालेला आहे. डॉ.ओमप्रकाश शेटे यांना राज्यातल्या आरोग्य व्यवस्थेमध्ये सुसूत्रता व सुधारणा करण्यासाठी या नवीन अभियानाची धुरा देण्यात आल्याचे समजते. डॉ.शेटे यांनी २०१४ ते २०१९ या कार्यकाळात अतिशय भरीव कामगिरी केली होती. त्यांनी सामान्य माणूस केंद्रबिंदू मानून 'पैश्याअभावी किंवा उपचारा अभावी सामान्य माणसाचा जीव जाता कामा नये' हा देवेंद्र फडणवीस यांचा संदेश राज्यातल्या कानाकोपऱ्या पर्यंत नेला. डॉ. शेटे यांची खासियत म्हणजे सर्वपक्षीय संबंध, कोणताही पक्षीय भेदाभेद न करता, कुठलीही शिफारस न घेता प्रामाणिकपणे काम करणे. सर्वसामान्य रुग्णांना जात, धर्म, पंथ विरहित न्याय देण्याचा प्रयत्न त्यांच्या कार्यकाळात झाला. त्यामुळेच त्यांची राज्यभरात 'देवदूत' म्हणून ओळख आहे. डॉ.शेटे हे मागील दोन वर्षापासून केंद्रातील आरोग्य मंत्रालयामध्ये आरोग्य राज्यमंत्री ना. भारतीताई पवार यांच्याकडे सहाय्यक सचिव म्हणून कार्यरत आहेत. अतिशय धडाडीचे, समय सूचक, धाडसी आणि संवेदनशील अधिकारी म्हणून त्यांची सर्वत्र ख्याती आहे. सामान्य रुग्णांना तात्काळ व सुलभ पद्धतीने उपचार मिळावे यासाठी नवीन व्यासपीठ निर्माण करण्याचा बहुधा हा देशातील पहिला प्रयोग असावा. ''आयुष्यमान भारत मिशन महाराष्ट्र'' या अभिनव उपक्रमाद्वारे नवीन समिती गठीत करुन या समितीच्या कक्ष प्रमुख पदी डॉ.ओमप्रकाश शेटे यांची निवड करण्यात आली आहे. या समितीमध्ये आरोग्य विभागाच्या आयुक्तांपासून ते कामगार व वैद्यकीय शिक्षण विभागाच्या संचालकांपर्यंत अनेक अधिकाऱ्यांच्या नियुक्ती करत हा लोकोपयोगी शासन निर्णय आजच निर्गमित करण्यात आला आहे. आरोग्य यंत्रणेमधील त्रुटी दुरुस्त करत सामान्य लोकांना उपचारासाठी जास्तीत जास्त लाभ देण्याचं मोठं आव्हान या समिती समोर आहे. डॉ.ओमप्रकाश शेटे यांच्या निवडीचे सर्व स्तरातून स्वागत होत आहे.

# वाळुंज अ‍ॅट्रॉसिटी प्रकरणातील मास्टरमाईंडवर कारवाई करा

## डॉ.बाबासाहेब आंबेडकर फोरम यांची मागणी



आष्टी/प्रतिनिधी : तालुक्यातील वाळुंज येथील कथित अ‍ॅट्रॉसिटी गुन्ह्यामध्ये आ.सुरेश धस यांच्या पत्नी प्राजक्ता धस यांना कट कारस्थान करून राजकीय सुडाने नाव घेत आदिवासी समाजात बदनामी व्हावी, या हेतुने जाणीवपूर्वक बदनामी केली गेली असून आ.सुरेश धस हे भटक्या विमुक्त जाती आदिवासी सर्व वंचित घटकांना न्याय देणारे नेते असून त्यांना विनाकारण या प्रकरणात गोवण्यात येत येत आहे. या प्रकरणाची सखोल चौकशी करून अर्जदार आदिवासी महिलेला फूस लावून गोरगरीब जनतेला पुढे करणाऱ्या यामागील मास्टर माईंड शोधावा व बदनामी केल्याबाबत चौकशी करून कारवाई करावी, अशी निवेदनाद्वारे मागणी डॉ.बाबासाहेब आंबेडकर सोशल फोरमचे जिल्हाध्यक्ष यशवंत खंडागळे यांच्यासह हजारो कार्यकर्त्यांसह तहसीलदार आष्टी पोलीस स्टेशन यांना आ.सुरेश धस यांच्या कुटुंबावरील खोटे गुन्हे मागे घ्या या घोषणा देत मोर्चा काढत निवेदन दिले.

या निवेदनाद्वारे डॉ.बाबासाहेब आंबेडकर फोरमच्या वतीने अशी मागणी केली आहे की, आ.सुरेश धस व त्यांच्या कुटुंबातील या घटनेचे काही संबंध नसताना पैसे उकळण्यासाठी काही राजकीय पुढाऱ्यांनी दलित आदिवासी समाजाच्या कुटुंबाला हाताशी धरून हा डाव रचला असून आदिवासी समाजात बदनामी व्हावी या हेतूने सदरील बदनामीचा प्रकार सुरू आहे. याचा आम्ही संपूर्ण तालुक्यातील सर्व धर्मीय जाहीर निषेध करत असून सदर प्रकरणाची सकल चौकशी करून प्रकरणांमध्ये खोटे षडयंत्र रचणारा मास्टरमाईंड व त्या आदिवासी महिलेचे फोन तपशील काढून संबंधिताविरुद्ध तत्काळ कारवाई करून धस कुटुंबांची बदनामी थांबवावी नाहीतर तीव्र पद्धतीने आंदोलन केले जाईल असा इशारा या निवेदनातून दिला आहे. यावेळी तालुक्यातील दीनदलित, आदिवासी, भटक्या, विमुक्त वंचित सर्व घटकांतील हजारो कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# काठीचा दणका घोंगडीची उब १५ नोव्हेंबर नंतर धनगर समाज सरकारला दाखवून देणार-दत्ता वाकसे

बीड/प्रतिनिधी

राज्यातील दोन कोटी धनगर समाजाचा गेल्या ७५. वर्षापासून धनगर समाजाच्या एसटी अनुसूचित.जमातीचे आरक्षणाची अंमलबजावणी करावी या मागणीसाठी संघर्ष चालू असून राज्यातील अनेक सरकार आली अनेक सरकार गेली परंतु धनगर. आरक्षणाचा तिढा मात्र जाणून बुजून या सरकारने सोडवला. नाही गेल्या महिनाभरापूर्वी धनगर समाज हा पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जन्मस्थळ चौंडी येथे धनगर समाजाचे एसटी अनुसूचित.जमातीच्या आरक्षणाच्या संदर्भामध्ये उपोषणाला बसला होता परंतु या ठिकाणी राज्याचे ग्रामविकास मंत्री गिरीश महाजन. यांनी या ठिकाणी उपोषणकर्त्या समाज बांधवाला आश्वासन. दिला आहे की ५०. दिवसापूर्वी धनगर समाजाच्या एसटी अनुसूचित जमातीच्या आरक्षणाचे अंमलबजावणी करू त्याच अनुषंगाने १५ नोव्हेंबर रोजी.धनगर समाजाला दिलेला अल्टिमेट संपत असून जर का धनगर समाजाच्या एसटी अनुसूचित जमातीचे आरक्षणाची अंमलबजावणी केली नाही तर १५ नोव्हेंबरच्या. नंतर या राज्यातला. दोन कोटी धनगर समाज या राज्य सरकारला धनगर समाजाच्या काठीचा दणका घोंगडीची उब दाखवल्याशिवाय आता शांत बसणार नाही असे प्रसिद्धी पत्रकाद्वारे शेफर्ड इंडिया इंटरनॅशनल संघटनेचे व्हॉइस प्रेसिडेंट दत्ता वाकसे यांनी दिला आहे. पुढे त्यांनी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकात म्हटले आहे की गेल्या ७५ वर्षापासून धनगर समाज हा धनगर समाजाच्या एसटी अनुसूचित जमातीच्या. आरक्षणाच्या अंमलबजावण्यासाठी संघर्ष करत आहे परंतु वेळोवेळी विविध. राज्यकर्त्यांकडून धनगर समाजाला. फसवण्याचे काम केले जात आहे परंतु आता मात्र धनगर समाजाला. ५० दिवसाचा. अल्टिमेट आणि वेळ.राज्य सरकारने दिलेला. आहे जर का राज्य सरकारने धनगर समाजाच्या एसटी अनुसूचित जमातीच्या. आरक्षणाची. अंमलबजावणी केली. नाही तर राज्यातील धनगर. समाजाचा उग्र स्वरूपाचे आंदोलन करणार आहे शासन प्रशासन व राज्यकर्त्यांना.या परिस्थितीचा सामना करावा लागेल त्यामुळे १५. नोव्हेंबरच्या अगोदर दिलेल्या. आश्वासनापूर्वी.धनगर समाजाच्या आरक्षणाची तात्काळ अंमलबजावणी करावी व राज्यातील मेंढपाळ कष्टकरी कामगार असलेल्या.या धनगर समाजाच्या उज्वल भविष्यासाठी. न्याय द्यावा अन्यथा आगामी काळात राज्यकर्त्यांना. याचे परिणाम मोठ्या प्रमाणात. भोगावे लागतील अशा देखील दिलेल्या प्रसिद्धी पत्रकामध्ये वाकसे यांनी म्हटले आहे

# येत्या ४८ तासात मुसळधार पावसाची शक्यता

बीड/प्रतिनिधी

देशातील हवामान गेल्या आठवडाभरापासून मोठा बदल होत आहे. पहाटे आणि रात्री थंडी, तर दिवस ऊन असे वातावरण आहे. पूर्वेकडून येणाऱ्या वाऱ्यांमुळे हवेतील गारवा वाढला आहे. त्यामुळे वातावरणात मोठा बदल झाला असून येत्या ४८ तासांत काही राज्यांमध्ये मुसळधार पाऊस होईल, असा अंदाज हवामान खात्याने वर्तवला आहे. तसेच हिमाचल प्रदेश आणि जम्मू-काश्मीरमध्ये बर्फवृष्टीचा देखील अंदाज आहे.

देशातून मान्सून पूर्णपणे परतला मात्र, अजूनही तामिळनाडू आणि केरळच्या विविध भागात मुसळधार पाऊस सुरू आहे. गेल्या २४ तासांत अंदमान-निकोबार बेट, केरळ आणि तामिळनाडूमध्ये काही ठिकाणी मुसळधार पावसाची नोंद झाली. तर पुढील सात दिवसांत दक्षिण द्वीपकल्पीय भारतात पावसाच्या हलक्या ते मध्यम स्वरुपाच्या सरी कोसळतील, असा इशारा हवामान खात्याने दिला आहे. खासगी



हवामान संस्थेच्या अंदाजानुसार तामिळनाडू, केरळ, आंध्र प्रदेशचा दक्षिण किनारा, किनारी कर्नाटक आणि अंदमान आणि निकोबार बेटांवर काही ठिकाणी मुसळधार पावसाची शक्यता आहे. याशिवाय लक्षद्वीप, रायलसीमा आणि दक्षिण अंतर्गत कर्नाटकात पावसाचा अंदाज वर्तवण्यात आला आहे.

छत्तीसगड आणि ओडिशामधील काही जिल्ह्यांना पावसाचा इशारा देण्यात आला आहे. पश्चिम हिमालयात तीन नोव्हेंबरपर्यंत हलका पाऊस आणि हिमवर्षाव होण्याची शक्यता आहे. यासोबतच हिमाचल प्रदेश आणि जम्मू-काश्मीरमध्ये बर्फवृष्टी होण्याचा अंदाज भारतीय हवामान खात्याने व्यक्त केला आहे. महाराष्ट्रात सिंधुदुर्ग आणि कोल्हापूर परिसरात पुढील ४८ तासांत मेघगर्जनेसह हलका पाऊस होण्याची शक्यता आहे. गोवा, कोल्हापूर, सिंधुदुर्ग जिल्ह्यात पावसाची हजेरी लागणार आहे.

# टायर जाळू न दिल्यामुळे पोलीस अधिकाऱ्याला मारहाण

## आष्टी तालुक्यातील कडा येथील घटना

आष्टी/प्रतिनिधी

रस्त्यावर टायर न जाळू दिल्यामुळे आंदोलनकर्त्यांनी पोलीस अधिकाऱ्यास मारहाण केली, तसेच कर्मचार्यांना धक्काबुक्की केली. या प्रकरणी चौघांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस उपनिरीक्षक अजित चाटे यांच्यासह पोलीस अंमलदार हनुमंत बांगर, व मजरुद्दीन सय्यद अशी जखमींची नावे आहेत.

आंदोलकांना सचारबंदी असल्याचे सांगूनही त्यांनी ऐकले नाही. येणाऱ्या-जाणाऱ्या वाहनावर दगडफेक करत असताना पोलीसांनी त्यांना अडवण्याचा प्रयत्न केला असता 'आम्हाला अडवू नका, नसता तुम्हाला जीवे मारु' अशी धमकी देत ते जाळपोळ करु लागले. उपनिरीक्षक चाटे यांना मारहाण करत कर्मचारी हनुमंत बांगर, मजरुद्दीन सय्यद यांना धक्काबुक्की करुन आरोपींनी शिवीगाळ केली. या प्रकरणी उपनिरीक्षक चाटे यांच्या फिर्यादीवरुन आष्टी पोलीस ठाण्यात सचिन अर्जुन चौधरी (वय ३०, रा.टाकळी अमिया, ता.आष्टी), प्रमोद ज्ञानेश्वर चौधरी (रा.टाकळी अमिया), राजेंद्र दिलीप झांबरे (३१,सराटेवडगाव), विनय सुनील गंवडे (रा. नालवडा, ता. दर्यापूर, जि.अमरावती) यांच्यावर भांदविचे कलम ३०७,३५३, ३३२ यासह विविध कलमानुसार गुन्हा दाखल झाला होता. सर्व आरोपींना अटक करण्यात आले असून पोलीस उपनिरीक्षक कृष्णा शिंदे हे करत आहेत.

# कार्यकर्त्यांना बळ देऊन त्यांना विकासाच्या प्रवाहात आणणार - रमेश गालफाडे

## बीव्हीपी च्या संकल्प मेळाव्यात मराठा आरक्षणाला पाठिंब्याची घोषणा

केज / प्रतिनिधी :- बहुजन समाज हा आर्थिकदृष्ट्या आजही कमकुवत आहे माझा लढा हा त्यांच्या सर्वांगीण उन्नतीसाठी आहे व तो कायम राहील बहुजनांसाठी काम करणाऱ्या कार्यकर्त्यांनी समाजाशी नाळ जोडून ठेवावी आपण अशा कार्यकर्त्यांना बळ देण्यासाठी कटिबद्ध राहू अशी ग्वाही नव्यानेच स्थापन झालेल्या बहुजन विकास परिषदेचे संस्थापक अध्यक्ष रमेश गालफाडे यांनी केज येथे आयोजित परिषदेच्या राज्यस्तरीय संकल्प मेळाव्यात बोलताना दिली. शहरातील मुक्ताई फंक्शन हॉल येथे परिषदेच्या या पहिल्या संकल्प मेळाव्याच्या अध्यक्षस्थानी बाळासाहेब सिरसाट हे होते तर सूर्यकांत भालेराव , दिलीप तेलंग , अशोक साठे अशोक सोनवणे , प्रकाश बोरसे , प्रेम गालफाडे , जगनाथ आव्हाढ , बबन सरवदे , गोरख मोमीन , अमित गालफाडे , , प्रदीप सरवदे , सुनील उमाप , निलेश सरवदे , अनिता गालफाडे , शीतल लांडगे , अर्चना इंगळे , यांची मुख्य उपस्थिती होती

पुढे बोलताना रमेश गालफाडे म्हणाले कि ; बीड जिल्ह्यातील महिला आर्थिकदृष्ट्या सक्षम व्हाव्यात याकरिता आपण एक वेगळे नियोजन करत आहोत अर्थात रोडमॅप तयार करत असून आगामी काही दिवसात त्याला मूर्त स्वरूप येणार आहे याचा पहिला टप्पा शिलाई मशीन त्यांना उपलब्धच नाही तर शाश्वत कामही त्यांना देणार आहोत आपण महिलांच्या विकासासाठी कटिबद्ध असल्याचा संकल्प व्यक्त केला तसेच दिवाळीनंतर महिलांचा एक स्वतंत्र मेळावा घेण्याची घोषणा देखील यावेळी केली तसेच त्यांनी बहुजन विकास परिषदेची स्थापना करण्यामागचा उद्देश देखील यावेळी विषद केला व कार्यकर्त्यांनी शासनाच्या योजना सर्वसामान्यांपर्यंत पोहोचवून त्यांना विकासाच्या प्रवाहात आणण्याचे कार्य करावे आपण कार्यकर्त्यांच्या पाठीशी भक्कमपणे उभे असल्याचे त्यांनी आवर्जून नमूद केले. यावेळी बोलताना कार्यक्रमाचे अध्यक्ष बाळासाहेब सिरसाट म्हणाले कि रमेश गालफाडे यांची बहुजनांप्रती असलेली तळमळ पाहूनच आपण त्यांच्यासोबत काम करण्याचा निर्णय घेतला ते प्रामाणिक असल्यानेच राज्यभरातून आलेले हि शेकडो कार्यकर्ते त्याची साक्ष देणारीच आहेत असे सांगितले यावेळी परिषदेच्या कार्याध्यक्षपदी बाळासाहेब सिरसाट यांची तर युवक राज्याध्यक्षपदी मोहन गुंड , तर राज्यउपाध्यक्षपदी सूर्यकांत भालेराव यांची नियुक्ती करण्यात आली

# डॉ. बाबासाहाब पठाण यांचे निधन

बीड : पाथर्डी तालुक्यातील येळी येथील रहिवाशी व सध्या बीड येथे वास्तव्यास असणारे डॉ. बाबासाहाब पठाण यांचे दि. १ नोव्हेंबर रोजी सायंकाळच्या दरम्यान अल्पशः आजाराने राहत्या घरी निधन झाले.



मृत्यूसमयी त्यांचे वय ७५ वय वर्षे होते. त्यांनी तिंतरवणी परिसरातील जवळपास ४० ते ५० गावांमध्ये अत्यंत कमी दरात रुग्णसेवा केली. सुरूवातीपासूनच सामाजिक सलोखा जोपासणारे व सर्व धर्म समभाव या तत्वाचा स्वीकार कणारे ते होते. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुली, एक मुलगा, सुन, नातवंडे असा मोठा परिवार आहे. ते विनायक विद्यालयाचे सहशिक्षक तन्वीर पठाण यांचे वडिल होत.

# हिवरसिंगा ग्रामपंचायतीत सरपंच पदासाठी चौरंगी लढत

शिरुर/प्रतिनिधी

बहुचर्चित हिवरसिंगा औरंगपुर ग्रुप ग्रामपंचायतमध्ये चौरंगी लढत पाहायला मिळत आहे. यामध्ये सिद्धेश्वर बहुजन एकता ग्रामविकास पनलच्या वतीने सरपंच पदासाठी ज्योती विजय शिंदे तर लोकनेते गोपीनाथ मुंडे साहेब बहुजन ग्रामविकास आघाडीच्या वतीने कांताबाई सखाराम शिंदे या उभ्या आहेत. तसेच अपक्ष म्हणुन सरपंच पदासाठी आशा लक्ष्मण ढोबळे व औसरमल शाहीनाथ दशरथ यांचीही उमेद्वारी दाखल आहे. प्रामुख्याने लढत हि ज्योती विजय शिंदे व कांताताबाई लक्ष्मण शिंदे यांच्यात होत आहे.



हिवरसिंगा औरंगपुर ग्रुप ग्रामपंचायतचा इतिहास पाहिला असता ग्रामापंचायतवर साहेबराव शिंदे यांचे वर्चस्व राहीले आहे. स्थापने पासुन फक्त दोन पंचवार्षिक सोडता एकहाती सत्ता त्यांची राहीलेली आहे. आजही त्यांच्यात नेतृत्वात ग्रामापंचायत लढवली जात आहे. गेल्या पंचवार्षिकला जनतेतुन सरपंच निवड करण्याचा कायदा महायुती सरकारने आखला. त्यावेळी हिवरसिंगा ग्रामपंचायत मधुन प्रथमच जनतेतुन सरपंच म्हणुन रंजना चंद्रकात सानप यांची निवड झाली. हिवरसिंगा ग्रामपंचायतचे सरपंचपद हे अणुसुचित जातीसाठी सुटल्याने अनेकांना सरपंच पदावर पाणी फेरावे लागले. गेल्या पंचवार्षिकमध्ये केलेले विकास कामे पुढे ठेवुन लोकनेते गोपीनाथ मुंडे ग्रामाविकास पनल मैदानात उतरला आहे, तर सिद्धेश्वर बहुजन एकता ग्रामविकास पनलच्या वतीने हिवरसिंगा औरंगपुर येथील जनतेला विश्वासात घेऊन विकास कामे आम्ही पुर्ण करु असा मतदारांना विश्वास देत आहे. गेल्या पंचवार्षिकची परिस्थिती वेगळी होती व आताची परिस्थिती वेगळी आहे. त्यामुळे गावाचा कल कोणाकडे असेल हे निकाल लागल्या नतंरच कळेल. सिद्धेश्वर बहुजन एकता ग्रामविकास पनलने जोरात प्रचार चालवला आसुन तिनही वार्डात उमेद्वार हे पायाला भिगंरी बांधल्यागत फिरत आहेत. बस स्टँडवर सकाळपासुन रात्रीप्रर्यंत सर्वत्र ठिकठिकाणी गजबजलेला परीसर पाहायला मिळत आहे. दोन्हीही गटाकडुन आपल्यालाच पांठिबा मिळावा म्हणून शर्थीचे प्रयत्न केले जात आहेत. ग्रामापंचायत निवडनुकीच्या निमित्ताने राजकीय खेळी सुरु झाली आहे. कार्यकर्ते जोडण्याकरीता अनेक प्रलोभने दाखवली जात आहेत.

आपले राजकिय अस्थित्व टिकवुन ठेवण्याकरीता नेते आपली पुर्ण ताकद लावताना दिसत आहेत. त्यामुळे बोचऱ्या थंडीत गावातील वातावरण तापल्याचे दिसुन येत आहे. निवडनुकीच्या रणधुमाळीत गावपुढाऱ्याकडून रोटी बोटी चपटी अशा सर्वच गोष्टी अवलंबविल्या जाणार असल्याचा अंदाज वर्तवला जात आसुन सुजान मतदारानी आपले अमुल्य मत जो आपल्या कामासाठी अहोरात्र झटतो. कधीही हाकेला वो देतो अशाच उमेद्वारांना निवडून देने हे आपले आद्य कर्तव्य आहे. मतदानाला अजुन दोन दिवस बाकी आहेत. यातल्या काही दिवसात मोठ्या घडामोडी घडु शकतात असा अंदाज वर्तवला जात आहे. सध्या शांततेत प्रचार आसुन रात्रीच्या भेठीगाठीवर अधिक भर दिसुन येत आहे.

# सुरज देशमुख याने तायक्कांदो स्पर्धेत रौप्य पदक पटकावले



अंबाजोगाई/प्रतिनिधि

डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ आणि विद्यापीठ क्रीडा विभागाच्या वतीने घेण्यात आलेल्या आंतर महाविद्यालयीन तायक्कांदो क्रीडा स्पर्धेत योगेश्वरी शिक्षण संस्था संचालित स्वामी रामानंद तीर्थ महाविद्यालयाचा खेळाडू सुरज मोहन देशमुख याने ८० किलो वजन गटात रौप्यपदक पटकावले. सुरजने मागील वर्षीही आंतर महाविद्यालयीन स्पर्धेत ८० किलो वजन गटात सुवर्णपदक पटकावले होते. आणि अमृतसर येथे झालेल्या आंतर विद्यापीठ स्पर्धेसाठीङ्गनिवड झाली होती या खेळाडूस क्रीडा विभाग प्रमुख प्रा.प्रविण भोसले यांनी मार्गदर्शन केले. या विजयी खेळाडूचे अभिनंदन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.जी.आय राठोड, रमेश सोनटक्के,प्रा.शैलजा बरुरे इतर प्राध्यापक,कर्मचारी आदींनीअभिनंदन केले आहे.

# अखेर शरद पवारांचं ठरलं! कापसेवाडीत शेतकरी मेळावा होणारच

## दिवाळीच्या दुसऱ्याच दिवशी जाणार शेतकऱ्यांच्या बांधावर

राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार हे दिवाळी झाल्यानंतर लगेच दुसऱ्याच दिवशी शेतकऱ्यांच्या बांधावर जाणार आहेत. शरद पवार हे १६ नोव्हेंबरला माढा लोकसभा मतदारसंघातील कापसेवाडीत होणाऱ्या शेतकरी मेळाव्याला उपस्थित राहणार आहेत. सोलापूर, उस्मानाबाद आणि सांगली जिल्ह्यातील शेतकरी या मेळाव्याला उपस्थित राहणार आहेत. सध्या या तिन्ही जिल्ह्यात बेदाणा, दूध आणि टॉमॅटो उत्पादक शेतकऱ्यांचा प्रश्न ऐरणीवर आहे. या संदर्भात शरद पवार हे कापसेवाडीत शेतकरी मेळावा घेणार आहेत.

तब्बल ९४ हजार टन बेदाणा कोल्ड स्टोरेजमध्ये पडून

सध्या राज्यात २ लाख ५७ हजार टन बेदाण्याचे उत्पादन झाले आहे. यातील तब्बल ९४ हजार टन बेदाणा योग्य दर मिळत नसल्याने अजुनही कोल्ड स्टोरेजमध्ये पडून आहे. याबाबत शेतकऱ्यांनी बेदाण्यावरील निर्यात शुल्क कमी करुन आयात शुल्क वाढवण्याची मागणी केली आहे. द्राक्ष उत्पादक शेतकरी कृषीनिष्ठ परिवाराचे नितीन बापू कापसे यांच्यासह काही शेतकऱ्यांनी आज वाय



बी चव्हाण सेंटर मुंबईत येथे शरद पवार यांची भेट घेतली. त्यानंतर शरद पवार यांनी तातडीने कापसेवाडी येथील मेळाव्याला येण्याचं मान्य केल्याची माहिती नितीन बापू कापसे यांनी दिली आहे.

शेतकऱ्यांच्या व्यथा जाणून घेण्यासाठी शरद पवार कापसेवाडीत येणार

द्राक्षाचे भाव गडगडल्या मुळे त्यातुन सावरण्यासाठी शेतकऱ्यांनी मोठ्या प्रमाणावर बेदाणा तयार केला. त्यामुळे बेदाण्याचे दर कोसळले. सध्या वाढलेले टॉमेटोचे दरही कोसळले आहेत. दुध उत्पादकही दर कमी झाल्याने अडचणीत आले आहेत. या सर्व शेतकऱ्यांच्या व्यथा जाणून घेण्यासाठी देशाचे माजी कृषिमंत्री शरद पवार कापसेवाडीत येणार आहेत. दरम्यान, २३ ऑक्टोबरला देखील शरद पवार हे कापसेवाडीत येणार होते. मात्र, अचानक ऐनवेळी त्यांचा दौरा रद्द झाला होता. मात्र, येत्या १६ नोव्हेंबरला शरद पवार कापसेवाडीत येणार असल्याची माहिती कृषीनिष्ठ परिवाराचे नितीन कापसे यांनी दिली.

शरद पवार यांच्या माढा दौऱ्याची चर्चा अनेक दिवसांपासून होती. २३ ऑक्टोबरच्या दौऱ्याची संपूर्ण तयारी देखील आयोजकांकडून करण्यात आली होती. मात्र शरद पवारांचा दौरा अचानक रद्द झाल्याने राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आले आहे. त्या दिवशी शरद पवार हे बारामतीतून सोलापूरला न जाता शरद पवार थेट पुण्याला गेले. हा दौरा का रद्द करण्यात आला याची कोणतेही कारण समोर आले नाहीत. अचानक दौरा रद्द झाल्यानं कार्यकर्ते देखील संभ्रमात पडले होते. तसेच अनेक शेतकऱ्यांनी नाराजी देखील व्यक्त केली होती.

# रेशीम कीटकावरील उझी माशीचे एकात्मिक नियंत्रण





रेशीम कीटकांवर उपजीविका करणारी परोपजीवी कीड उझी माशी ही रेशीम उद्योगात नुकसानकारक ठरते. या किडींचा प्रादुर्भाव कमी अधिक प्रमाणात दिसून असून, उझी माशीच्या प्रादुर्भावामुळे कोषाचे १५ ते २० टक्क्यांपर्यंत नुकसान होऊ शकते. त्यामुळे उझी माशीच्या नियंत्रणासाठी वेळीच उपाययोजना करण्याची आवश्यकता असते. उझी माशीचा प्रादुर्भाव वाढण्याची कारणे : रेशीम कीटक संगोपनामध्ये वाढ होत असून, उझी माशीस सातत्याने अन्नाची उपलब्धता होत आहे. अनेक रेशीम उत्पादक दोन बॅचेसमध्ये १५ ते २० दिवसांचा खंडही ठेवत नाहीत. प्रौढ माशीचा जीवन कालावधी १२ ते १८ दिवसांचा असून, त्या ४०० ते ५०० अंडी देतात. निसर्गातील उझी माशींच्या शत्रूकीटकांची संख्या विविध कारणांमुळे कमी होत आहेत. उझी माशीवरील परोपजीवी निसोलीनक्स थायमस या मित्रकीटकांचे संवर्धन करण्याची आवश्यकता आहे.

नुकसान कालावधी : उझी माशीचा प्रादुर्भाव वर्षभर आढळत असला, तरी ऑगस्ट ते नोव्हेंबर या दरम्यान जास्त प्रादुर्भाव राहतो. बदलता पाऊस, तापमान आणि आर्द्रतेनुसार उझी माशीची अंडी देण्याची क्षमता बदलते. पावसाळा आणि हिवाळ्यात उझी माशीचा जास्त प्रमाणात प्रादुर्भाव आढळतो. उन्हाळ्यात ३२ ते ४२ अंश सेल्सिअस तापमानामुळे मार्च ते जून महिन्यात उझी माशीचा प्रादुर्भाव कमी दिसून येतो.

जीवनक्रम : चार अवस्था : अंडी, छोटी अळी (मॅगट), कोष, प्रौढ माशी.

उझी माशी एका वेळी ४०० ते ५०० पांढऱ्या दुधाळ रंगाची अंडी देते. उझी माशीची मादी १ ते २ अंडी वाढीच्या चौथ्या किंवा पाचव्या अवस्थेत असलेल्या रेशीम अळीच्या त्वचेत टाकते. अंड्यातून ४८ ते ६२ तासांत (२ ते ३ दिवस) मॅगट बाहेर येते.

आपल्या छातीजवळ असलेल्या हूकच्या साह्याने छिद्र करून रेशीम अळीच्या शरीरात शिरतात. त्या ठिकाणी काळा डाग पडतो. फिक्कट पिवळसर अळी अवस्था ६ ते ८ दिवसांची राहते. अळीचे लालसर तपकिरी कोषात रूपांतर होते. कोषावस्था १० ते १२ दिवसांची असते. अशा प्रकारे उझी माशीचा जीवनक्रम १८ ते २२ दिवसात पूर्ण होतो.

प्रादुर्भावाची लक्षणे : रेशीम अळ्यांच्या शरीरावर काळे डाग दिसतात.कोषाच्या टोकाला गोलाकार छिद्र दिसते. रेशीम कोष तयार झाल्यास संगोपन ट्रेमध्ये उझी माशीचे तपकिरी रंगाचे कोष दिसतात.

उझी माशी नियंत्रण : उझी माशीचा प्रादुर्भाव कमी करण्यासाठी एकात्मिक पद्धतीचा वापर करणे गरजेचे आहे.

अ) मशागतीय पद्धत : राज्यात जवळपास ९८ टक्के कच्चे शेडनेट संगोपनगृह आहेत. शक्यतो पक्के सिमेंट काँक्रीटमध्ये बांधकाम करून शिफारशीप्रमाणे दरवाजे खिडक्या आणि हवा खेळती राहण्यासाठी व्यवस्था करावी. तुती पाने साठवण करण्यासाठी वेगळी अंधारी खोली असावी. फांदी खाद्य देण्याअगोदर उझी माशी फांद्या किंवा पानांद्वारे सरळ संगोपनगृहात प्रवेश करते. रेशीम कीटकांच्या दोन बॅचेसमध्ये कमीत कमी १५ दिवसांचे अंतर ठेवावे. कोष विक्री केलेल्या बाजारातून पोते घरी आणू नये. कारण या सोबत उझी माशीच्या अळ्या, कोष आपल्या संगोपनगृहात येण्याची शक्यता असते.

रेशीम कीटकांची विष्ठा शेतात उघड्यावर न फेकता खताच्या (कंपोस्ट) खड्ड्यात गाडून टाकावी. कारण विष्ठेत उझी माशीच्या सुप्त अवस्था (कोष) असतात. प्रादुर्भावग्रस्त गावात एप्रिल ते मे महिना कोषाचे पीक बंद ठेवावे.

ब) यांत्रिक पद्धत : संगोपन गृह, कोष खरेदी केंद्र, धागानिर्मिती केंद्र अशा सर्व ठिकाणी अळ्या, कोष गोळा करून जाळून नष्ट करावेत. या सर्व ठिकाणच्या जमिनीच्या भेगा बुजवून घ्याव्यात. प्रौढ रेशीम कीटक संगोपनगृह ८२ २३ उंची १५ फूट आकाराच्या संगोपनगृहासाठी (२५० अंडी पुंजांसाठी) ७-८ कामगंध सापळे लावावे. संगोपनगृहाच्या बाहेरून २० फूट अंतरावर लावलेल्या या कामगंध सापळ्यातील गंधगोळीकडे (ल्यूअर) नर माश्या आकर्षित होन अडकतात. परिणामी, नर मादीच्या गुणोत्तर बिघडून प्रजनन प्रक्रियेत अडथळा येतो. सर्व खिडक्या व दरवाजांना नायलॉन वायर मेश जाळी लावून घ्यावी. म्हणजे उझी माशी कीटक संगोपनगृहात सरळ प्रवेश करणार नाही. गोळा केलेल्या अळ्या, कोष डिटर्जंटच्या द्रावणात टाकून नष्ट करावेत. रेशीम कीटकाच्या तिसऱ्या अवस्थेपासून पुढे उझी माशीचे सापळे कोष विणन काळापर्यंत रॅकवर लावावेत.

क) जैविक पद्धत : उझी माशीच्या कोषावरील परोपजीवी निसोलायनक्स थायमस हे परोपजीवी कीटक संगोपनगृहात रेशीम कीटकांनी चौथी कात टाकल्यानंतर तिसऱ्या किंवा चौथ्या दिवशी सोडावेत. १०० अंडीपुंजांसाठी परोपजीवी कीटकांचे दोन पाऊच लागतात. रेशीम कीटक कोषावर गेल्यानंतर निसोलायनक्स थायमस परोपजीवी कीटकांचे पाऊच चंद्रिकेजवळ ठेवावेत. कोष काढणीनंतर खताच्या खड्ड्याजवळ ठेवावेत. हे पाऊच रेशीम संशोधन योजना, वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी यांच्याकडे विक्रीसाठी उपलब्ध आहेत. आधी पैसे भरून मागणी केल्यास कुरियरनेही पाठवले जातात. अशा प्रकारे एकात्मिक पद्धतीचा वापर केल्यास रेशीम कोषाचे होणारे नुकसान टाळता येईल.

# व्यवस्थापन दुधाळ गाईचे

गाईंची उत्पादनक्षमता ही त्यांच्या आनुवंशिक गुणांवर त्याचप्रमाणे त्यांच्या वयात येण्यापूर्वीच्या शारीरिक वाढीवर अवलंबून असते. गाभण जनावरांचा खुराक समतोल असावा. त्यामध्ये प्रथिने, कर्बोदके, खनिज द्रव हे सर्व घटक समतोल प्रमाणात असावेत.

संकरित जातीच्या कालवडी लवकर वयात येतात. संकरित गाईमध्ये दूध उत्पादनाची क्षमता जास्त असते, तसेच भाकड काळ कमी असतो. सामान्यतः जास्त दूध देणाऱ्या गाईचा मागचा भाग मोठा व रुंद असतो. चारही सड एकाच आकाराचे असतात. सडांची लांबी सारखी असते. कासेच्या शिरा या मोठ्या आकाराच्या, लांब व स्पष्ट दिसतात. कातडी ही तजेलदार, पातळ, मऊ असते. सर्वसाधारणपणे गाय समोरून निमुळती व मागे रुंद दिसते. त्यांचा बांधा भक्कम असतो. दूध काढण्याअगोदर गोठा स्वच्छ करावा. त्यांनतर कास व शेपटीमागील भाग स्वच्छ पाण्याने धुवावा. कास स्वच्छ फडक्याने कोरडी करावी. दूध काढणाऱ्या माणसाचे हात स्वच्छ असावेत. त्याला कुठल्याही प्रकारचा संसर्गजन्य आजार नसावा. त्याने नखे काढलेली असावीत. दूध कोरड्या हाताने काढावे. दूध हलक्या हाताने आणि वेगाने काढावे. दूध काढण्याच्या वेळेत बदल करू नये. दूध काढण्याची भांडी स्वच्छ व कोरडी असावीत.

प्रत्येक आठवड्याला कासदाह चाचणी करावी.

दुभत्या गाईचे संगोपन - गाईला दुधोत्पादनाच्या प्रमाणात खाद्य द्यावे. गाईला सरासरी १५ ते २० किलो हिरवा, ५ ते ८ किलो कोरडा चारा रोज द्यावा. दूध उत्पादनासाठी दुधाच्या ४० टक्के खुराक द्यावा. त्याचप्रमाणे शरीर पोषणासाठी दीड ते दोन किलो खुराक द्यावा. गाईंना रोज दोन ते तीन तास फिरायला मोकळे सोडावे, त्यामुळे त्यांच्या शरीराचा व्यायाम होईल. जनावरांना समतोल खाद्य मिळेल याची काळजी घ्यावी.

माजावर आलेल्या गाईचे व्यवस्थापन - गाय सुमारे २१ दिवसांच्या अंतराने माजावर येते. माजाची लक्षणे दिसल्यापासून सुमारे १० ते १८ तास भरल्यानंतर २० ते २१ दिवसांनी माज



दाखवत नाही. काही गाई दुसऱ्या-तिसऱ्या महिन्यांत माजावर येतात. अशा गाईंची पशुवैद्यकाकडून तपासणी करून औषधोपचार करावा.

गाभण गाईचे संगोपन - गाभण गाईंना शेवटच्या अडीच महिन्यांच्या काळात दीड किलो समतोल खाद्याचा जादा पुरवठा करावा. विण्याच्या अगोदर मोकळे फिरायला द्यावे. गाई विण्याच्या वेळी दूरूनच तिच्यावर लक्ष ठेवावे. गोठ्यात टोकदार दगड व खिळे असू नयेत.

प्रसूतिपूर्व व्यवस्थापन - जनावरांची उत्पादनक्षमता ही त्यांच्या आनुवंशिक गुणांवर त्याचप्रमाणे त्यांच्या वयात येण्यापूर्वीच्या शारीरिक वाढीवर अवलंबून असते. वयात येण्यापूर्वीची शारीरिक वाढ प्रामुख्याने गर्भात असतानाच्या वाढीवर अवलंबून असते, म्हणून गाभण काळात जनावरांची योग्य काळजी घेणे महत्त्वाचे असते. गाभण जनावरांची प्रसूतिपूर्व काळजी घेतल्यास पुढे येणाऱ्या अडचणींवर मात करता येते. गायींचा गाभणकाळ नऊ महिने नऊ दिवसांचा असतो. गाभण जनावरांचा खुराक समतोल असावा, त्यामध्ये प्रथिने, कर्बोदके, खनिज द्रव हे सर्व घटक समतोल प्रमाणात असावेत.

भाकड काळाचे नियोजन - रेतन केलेल्या तारखेची नोंद महत्त्वाची असते कारण त्या नोंदीनुसार तिचे दूध काढणे बंद करावे. प्रसूतीच्या अडीच ते तीन महिने अगोदर दूध काढणे बंद करावे. दूध काढणे बंद केल्यामुळे दुग्ध उत्पादनासाठी लागणारे अन्नघटक गायीची झालेली शारीरिक झीज भरून काढण्यासाठी व गर्भातील वासराच्या वाढीसाठी उपयोगात आणले जाते. पुढील वेतातील दुधासाठी कासेची वाढसुद्धा चांगल्या प्रकारे होईल. विण्यापूर्वी गायीचे व गर्भातील वासराचे आरोग्य चांगले राहील. विण्यापूर्वी प्रत्येक गाय अडीच ते तीन महिने भाकड असावी. देशी गायीच्या दोन वेतात दीड ते दोन वर्षे अंतर राहते, त्या जेमतेम ६ ते ७ महिनेच दूध देतात म्हणजेच विण्यापूर्वी १२ ते १७ महिने ही भाकड राहतात. मात्र संकरित गायी आणि त्यामध्ये पहिल्या वेतातील गायी वेत संपत आले तरी बरेच दूध देतात. अशा गायी आटवणे खूप आवश्यक असते.

विण्यापूर्वी किमान अडीच महिने गाय भाकड राहिली पाहिजे नाहीतर त्यांचे पुढील वेतातील दूध उत्पादन निश्चितच कमी होते. गाय जर जास्त दुधाळ असेल तर याहून अधिक काळ म्हणजे तीन महिन्यांपर्यंत भाकड ठेवणे गरजेचे असते. गाय ३ ते ४ लिटर दूध देत असेल, तर धार काढणे एकदम बंद करावे. याहून जास्त दूध देणाऱ्या गायीचा खुराक बंद करावा. धार दिवसातून दोनदा काढत असल्यास ती एकदा आणि एकदा काढत असल्यास ती दोन तीन दिवसांआड काढावी. गाय आटल्यानंतर ती २ ते ३ दिवसांत कास कमी करते, त्यानंतर तिच्या प्रत्येक सडात पशुतज्ज्ञांच्या सल्ल्याने प्रतिजैविक सोडावे. यामुळे भाकड काळात गायीला काससुजीचा धोका होणार नाही. गाय पूर्णतः भाकड (आटल्यानंतर) झाल्यानंतर गरजेनुसार आहार परत सुरू करावा.

खाद्य व्यवस्थापन - ज्या ठिकाणी भरपूर प्रमाणात हिरवा चारा उपलब्ध आहे अशा हिरव्या कुरणात गाभण गाईस चरण्यासाठी सोडण्याची सोय असल्यास ते निश्चितच फायद्याचे ठरते, त्यामुळे गाभण गाईला ताजी वैरण खायला मिळते. बरोबरच मोकळ्या जागेत फिरायला मिळत असल्याने मोकळी हवा, सूर्यप्रकाश आणि आवश्यक तो शारीरिक व्यायाम होतो. हिरव्या चाऱ्याची सोय नसेल तर गोठ्यातच भरपूर प्रमाणात हिरवा चारा खाण्यास देता येईल, अशी व्यवस्था करावी. शेवटच्या दोन महिन्यांत गर्भाची वाढ झपाट्याने होते, त्यामुळे या काळात चाऱ्यात वाढ करावी. कारण गर्भावस्थेच्या अंतिम काळात गाभण गाईला स्वतःच्या पोषणाकरिता किमान एक ते दीड किलो पशुखाद्य द्यावे.

गर्भाच्या वाढीसाठी आणखी एक ते दीड किलो जास्तीचे पशुखाद्य देण्याची गरज असते. अशा वेळी जास्त खाद्य दिल्याने गर्भाची वाढ चांगल्या प्रकारे होते. गाईचे आरोग्य चांगले रहाते.

वासरांचे संगोपन -

वासरू जन्मल्यानंतर गाय त्याच्या नाकातील कानातील व तोंडातील सर्व चिकट पदार्थ स्वच्छ करते; मात्र वासराचे कोवळे खूर लवकर काढावेत. नाळ आपोआप तुटली नसल्यास ती २ ते ३ सेंटिमीटर अंतरावर जंतुनाशकामध्ये भिजवलेल्या दोऱ्याने घट्ट बांधून त्यापुढील भाग निर्जंतुक केलेल्या कात्रीने कापावा. त्यानंतर त्यावर दिवसातून २ ते ३ वेळा निर्जंतुक द्रावण लावावे.वासरू जन्मल्यानंतर सुमारे एक तासाच्या आत त्याच्या वजनाच्या ८ ते १० टक्के चीक पाजावा. तसेच प्रतिदिवस याच प्रमाणात दूध पाजावे. वासराला दूध पाजाल्यानंतर थोडा वेळ तोंडाला मुसकी बांधावी. शिंगे वाढू नयेत म्हणून ७ ते १० दिवसाच्या आत तज्ज्ञांच्या सहकार्याने शिंगे काढावीत.




## महत्वाच्या घटना

- १८९६ : पुण्यात डेक्कन सभेची स्थापना.
- १९१८ : पहिले महायुद्ध ऑस्ट्रिया व हंगेरीने इटलीसमोर शरणागती पत्करली
- १९२१ : जपानचे पंतप्रधान हारा ताकाशी यांची टोकियो येथे हत्या
- १९२२ : तुतनखामेन राजाच्या प्रसिद्ध पिरॅमिडमधील कबरस्थानाचे मुख्य द्वार शोधण्यात यश
- १९४८ : डॉ. बाबासाहेब आंबेडकर अध्यक्ष असलेल्या घटना समितीने घटनेचा मसुदा सादर केला.
- १९९६ : कलागौरव प्रतिष्ठानच्या वतीने देण्यात येणारा 'नाट्यगौरव पुरस्कार' डॉ. श्रीराम लागू व सत्यदेव दुबे यांना जाहीर
- २००० : हिन्दुस्तानी शास्त्रीय संगीतातील असामान्य कामगिरीबद्दल गायक पं. भीमसेन जोशी यांना 'आदित्य विक्रम बिर्ला कलाशिखर पुरस्कार' जाहीर
- २००१ : हॅरी पॉटर अण्ड फिलॉसॉफर्स स्टोन या चित्रपटाचा लंडन येथे प्रिमियर.
- २००८ : बराक ओबामा हे अमेरिकेचे पहिले कृष्णवर्णीय राष्ट्राध्यक्ष बनले.

## जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

- १६१८ : औरंगजेब सहावा मुघल सम्राट (मृत्यू: ३ मार्च १७०७)
- १८४५ : वासुदेव बळवंत फडके राजकीय भूमिका घेऊन इंग्रजांविरुद्ध सशस्त्र उठाव करणारे क्रांतिकारकांचे मेरुमणी (मृत्यू: १७ फेब्रुवारी १८८३)
- १८७१ : शरदचंद्र रॉय मानववंशशास्त्रज्ञ. १९१२ ते १९३९ या दरम्यान ओरिसा बिहारमधील जमातींचा अभ्यास करुन त्यांनी शंभरहून अधिक शोधनिबंध व सात ग्रंथ लिहीले. (मृत्यू: १९४२)
- १८८४ : जमनालाल बजाज प्रसिद्ध गांधीवादी कार्यकर्ते, स्वातंत्र्यसैनिक आणि बजाज उद्योगसमुहाचे प्रणेते (मृत्यू: ११ फेब्रुवारी १९४२)
- १८९४ : सीताराम पुरुषोत्तम तथा कर्मवीर अप्पासाहेब पटवर्धन कोकण गांधी (मृत्यू: १० मार्च १९७१)
- १८९७ : भारतीय वनस्पतिशास्त्रज्ञ जानकी अम्माल यांचा जन्म. (मृत्यू: ४ फेब्रुवारी १९८४)
- १९१६ : बार्बी बाहुलीच्या निर्मात्या रुथ हँडलर यांचा जन्म. (मृत्यू: २७ एप्रिल २००२)
- १९२५ : ऋत्विक घटक चित्रपट निर्माते आणि पटकथालेखक (मृत्यू: ६ फेब्रुवारी १९७६)
- १९२९ : शकुंतलादेवी गणितज्ञ, ज्योतिर्विद आणि अतिवेगाने आकडेमोड करणारी भारतीय महिला (मृत्यू: २१ एप्रिल २०१३)
- १९२९ : जयकिशन डाह्याभाई पांचाळ 'शंकर-जयकिशन' या संगीतकार जोडीतील संगीतकार (मृत्यू: १२ सप्टेंबर १९७१)
- १९३० : भारतीय औषधीशास्त्रज्ञ आणि शैक्षणिक रंजीत रॉय चौधरी यांचा जन्म. (मृत्यू: २७ ऑक्टोबर २०१५)
- १९३४ : विजया मेहता दिग्दर्शिका
- १९३९ : चालते बोलते गणिती यंत्र म्हणून ओळखल्या जाणाऱ्या शकुंतलादेवी यांचा जन्म.
- १९५० : व्हर्जिन ग्रुपचे सहसंस्थापक निग पॉवेल यांचा जन्म.
- १९५५ : भारतीय लेखक, कवी आणि विद्वान अल्हाज मौलाना घोसी शाह यांचा जन्म.
- १९७१ : तब्बू अभिनेत्री
- १९८६ : भारतीय उद्योजक सुहास गोपीनाथ यांचा जन्म.

## मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

- १९७० : पं. शंभू महाराज लखनौ घराण्याचे कथ्थक नर्तक (जन्म:१९१०)
- १९९१ : पुरुषोत्तम विश्वनाथ तथा पु. वि. बापट प्राच्य विद्या संशोधक, आंतरराष्ट्रीय कीर्तीचे पाली भाषा कोविद, सिंहली, ब्राम्ही व थाई भाषा तज्ञ, त्यांनी सुमारे १४० शोधनिबंध प्रसिद्ध केले. (जन्म: १२ जून १८९४)
- १९९२ : मोटर-व्हीलचेअरचे निर्माते जॉर्ज क्लाईन यांचे निधन. (जन्म: १५ ऑगस्ट १९०४)
- १९९५ : यित्झॅक राबिन इस्त्रायलचे ५ वे पंतप्रधान, संरक्षणमंत्री आणि नोबेल पारितोषिक विजेते (जन्म: १ मार्च १९२२)
- १९९८ : हिंदी कवी नागार्जुन यांचे निधन.
- १९९९ : माल्कम मार्शल वेस्ट इंडिजचा क्रिकेटपटू (जन्म: १८ एप्रिल १९५८)
- २००५ : सदाशिव मार्तंड गर्गे समाजविज्ञान कोशकार (जन्म:)
- २०११ : दिलीप परदेशी नाटककार व साहित्यिक (जन्म:)

# ऊस पाचट न जाळता शेतातच कुजवा

उसतोड झाल्यानंतर बरेच शेतकरी शेतात शील्लक राहिलेल पाचट जाळून टाकतात. पाचट जाळल्यामुळे प्रदुषण तर होतच शिवाय जमिनीतील उपयुक्त सुक्ष्मजिवाणू देखील नष्ट होतात. हे टाळायच असेल तर शेतात उसाच्या पाचटाचे अच्छादन करुन हे पाचट शेतातच कुजवण गरजेच आहे. शेतात पाचट अच्छादनाचे फायदे काय आहेत याविषय़ीची माहिती आपण या व्हिडीओतून घेणार आहोत. पीक वाढीनुसार पाण्याचे अयोग्य व्यवस्थापन, जमिनीतील कमी होणारे सेंद्रिय कर्बाचे प्रमाण यामुळे ऊस उत्पादनावर परिणाम होत आहे. यावर ऊस पाचट व्यवस्थापन हा एक चांगला उपाय आहे. एक हेक्टर ऊस क्षेत्रातून सुमारे ८ ते १२ टन पाचट मिळत, त्यापासून ५ ते ६ टन सेंद्रिय खत खोडवा पिकाला मिळते. पाचटाचे विघटन होत असताना त्यामध्ये असणार ४० ते ५० किलो नत्र, २० ते ३० किलो स्फुरद आणि ७५ ते १०० किलो पोटॅश पुढील पिकास उपलब्ध होत. ऊस तोडणीनंतर ७० टक्के शेतकरी शेतात उरलेल पाचट जाळून टाकतात. त्यामुळे केवळ ५ टक्के म्हणजे सुमारे हेक्टरी ५०० किलो पाचटाची राख शिल्लक राहते. तसेच मोठ्या प्रमाणात हवेचे प्रदूषण होऊन उष्णतेने जमीन आणि त्यातील उपयुक्त जिवाणू आणि गांडुळावर परिणाम होतो.

पाचट आच्छादनाचे फायदे काय आहेत? ऊस तोडणी झाल्यानंतर शेतकरी उसाचे पाचट जाळून टाकतात, सर्व सरीच्या बगला फोडून रासायनिक खताची मात्रा देऊन पाणी दिल जात.

पाणी आणि खते गरजेपेक्षा जास्त प्रमाणात वापरले तर तणांची मोठ्या प्रमाणात वाढ होते. उसाचे पाचट न जाळता ते एक आड एक सरीमध्ये पसराव. किंवा सर्व सरीत पाचट दाबून बसवावे. हे पाचट शेतात आच्छादनाच काम तर करतच. याशिवाय पाचट कालांतराने कुजल्यानंतर त्यापासून पिकाला चांगल सेंद्रिय खत देखील मीळत. पाचटाच्या आच्छादनामुळे जागेवर तण उगवत नाही. उसाला जी खते दिली जातात त्या खतांचा अपव्यय होत नाही. तण व्यवस्थापनावरील होणाऱ्या खर्चात बचत होते.

# बीड जिल्ह्यातील मुली आता खेळणार 'थ्रोबॉल'

## किशोरवयीन मुलींसाठी थ्रोबॉल खेळ राबविणारा बीड पहिला जिल्हा

**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यातील एकूण ११ तालुक्यामधील १२५ शाळांमध्ये मुली थ्रोबॉल खेळणार. किशोरवयीन मुलींसाठी थ्रोबॉल खेळ राबविणारा बीड पहिला जिल्हा ठरला आहे. जिल्हाधिकारी दीपा मुधोळ मुंडे यांनी थ्रोबॉल आणि जाळी (नेट) प्राथमिक शिक्षणाधिकारी यांच्या सुपूर्त केले.

बालविवाहाला नकार देण्यासाठी बीड जिल्ह्यातील जिल्हाधिकारी मुधोळ मुंडे यांच्या नेतृत्वातून विविध उपक्रम राबविले जात आहेत. याचाच एक भाग म्हणून आता अकरा तालुक्यातील १२५ शाळांमध्ये मुली थ्रोबॉल खेळणार.रत्नदीप चॅरिटी ट्रस्टचे राजीव मेहता यांच्याकडून जिल्हाधिकारी यांना थ्रोबॉल आणि जाळी (नेट ) भेट स्वरूपात देण्यात आले.




हे थ्रो बॉल आणि नेट जिल्हाधिकारी यांनी जिल्ह्यातील प्राथमिक शिक्षणाधिकारी श्रीकांत कुलकर्णी यांना शाळेतील विद्यार्थिनींना थ्रोबॉल खेळ खेळण्यासाठी प्रवृत्त व्हावे म्हणून त्यांच्या सुपूर्त केले.

युनिसेफ आणि सेंटर फॉर सोशल अँड बिहेवियरल चेंज कम्युनिकेशन (एसबीसी थ्री) या आंतरराष्ट्रीय संस्थेने केलेल्या संशोधनानुसार थ्रोबॉल हा खेळ खेळल्याने मुलींची शारीरिक प्रकृती सुदृढ आणि सशक्त होत असल्याच्या निष्कर्षातून सिद्ध झाले आहे. त्यासाठीच थ्रो बॉल देण्यात आले आहे.

अधिक सुदृढ आणि सशक्त होईल. त्यांची उंची वाढेल आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे त्यांच्यातील आत्मविश्वास द्विगुणीत होईल. या सर्वांचा परिणाम 'बालविवाहला नकार' देण्याचे सामर्थ्य त्यांच्यात निर्माण करणे हे होय. प्रथम टप्प्यात १२५ शाळांना थ्रोबॉल आणि नेट देण्यात येणार असून उर्वरित शाळांना पुढील टप्प्यात वितरित केले जातील. थ्रोबॉल आणि नेट ही सामुग्री प्राथमिक शिक्षणाधिकारी यांना यांच्या सुपूर्त करताना अपर निवासी जिल्हाधिकारी डॉ. त्रिगुण कुलकर्णी, अन्य वरिष्ठ अधिकारी यांच्यासह सोनिया हंगे, वरिष्ठ प्रकल्प समन्वयक बालविवाह निर्मूलन प्रकल्प- युनिसेफ व एसबीसी थ्री या उपस्थित होत्या.

# मतदार नाव नोंदणीसाठी विशेष शिबिरे ४ नोव्हेंबर रोजी होणार पहिले शिबिर

**बीड । प्रतिनिधी**

भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार दि. १ जानेवारी २०२४ अर्हता दिनांकावर छायाचित्रासह मतदार यादीच्या विशेष संक्षिप्त पुनरीक्षण कार्यक्रमाच्या अंतर्गत दि. २७ ऑक्टोबर २०२३ ते ९ डिसेंबर २०२३ या कालावधीमध्ये नागरिकांकडून दावे व हरकती म्हणजेच मतदान नोंदणीचे मतदार यादीतील नोंदीच्या दुरुस्ती व वगळणीचे अर्ज मागविण्यात येणार आहेत.

या कार्यक्रमांतर्गत अधिकाधिक मतदारांनी त्यांची मतदान नोंदणी करून घेण्यासाठी विशेष शिबिरे आयोजित करण्याचे आयोगाचे निर्देशानुसार मतदार यादीच्या विशेष संक्षिप्त पुनरीक्षण कार्यक्रमाद्वारे दि. ४ नोव्हेंबर २०२३ (शनिवार) दि. ५ नोव्हेंबर २०२३ (रविवार) दि. २५ नोव्हेंबर २०२३ (शनिवार) आणि दि. २६ नोव्हेंबर २०२३ (रविवार) या चार दिवशी बीड जिल्ह्यातील २२८- गेवराई, २२९-माजलगाव, २३०- बीड, २३१- आष्टी, २३२- केज व २३३- परळी एकूण सहा विधानसभा मतदारसंघातील सर्व मतदान केंद्रांवर विशेष शिबिरे आयोजित करण्यात येत असून सर्व मतदारांनी मतदार यादी मध्ये मतदार नोंदणीचे, मतदार यादीतील नोंदीच्या दुरुस्ती व वगळणीसाठी अर्ज सादर करावेत. तसेच दरम्यानच्या कालावधीमध्ये विशेष संक्षिप्त पुनरीक्षण कार्यक्रम नुसार दि. १ जानेवारी २०२४ या अर्हता दिनांकावर आधारित ज्या युवकांना वयाची १८ वर्षे पूर्ण झालेले आहेत किंवा होणार आहेत अशा युवकांची नव मतदार म्हणून मतदार यादीत नोंदणी करण्याकरता त्याचप्रमाणे जुन्या मतदार यादीत ज्यांची नावे दुबार आहेत ती वगळणे, ज्यांच्या नावात सुधारणा होती ती सुधारणा करणे आणि एका विधानसभा मतदारसंघातून दुसऱ्या विधानसभा मतदारसंघात स्थलांतर करावयाचे असल्यास ते स्थलांतरण करणे इत्यादी करिता सर्व मतदान केंद्रस्तरीय अधिकारी यांच्या सहाय्याने तसेच ॲपद्वारे ऑनलाईन माध्यमांचा वापर करून व सदरील आयोजित विशेष शिबिरामध्ये अर्ज सादर करण्याचे आवाहन जिल्हाधिकारी तसेच जिल्हा निवडणूक अधिकारी दिपा मुधोळ मुंडे यांनी प्रसिध्दी पत्रकाव्दारे कळविले आहे.

# अखिल भारतीय नाट्य परिषद अंबाजोगाई च्या वतीने भव्य रांगोळी स्पर्धेचे आयोजन

अंबाजोगाई (प्रतिनिधी):- मराठी रंगभूमी दिनाचे औचित्य साधून ८ नोव्हेंबर २०२३ रोजी , श्री बालाजी शिक्षण प्रसारक मंडळाच्या न्यू व्हिजन पब्लिक स्कुल व अखिल भारतीय नाट्य परिषद शाखा अंबाजोगाई यांच्या संयुक्त विद्यमाने अंबाजोगाई शहरातील न्यू व्हिजन पब्लिक स्कुल,मोदी लर्निंग सेंटरच्या निसर्गरम्य व प्रशस्त प्रांगणात बुधवार दि ८ नोव्हेंबर दुपारी १ ते २:३० या वेळेत विविध वयोगटातील मुले, मुली , पुरुष व महिला यांच्यासाठी भव्य अशा रांगोळी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती संस्थेचे संस्थापक सचिव राजकिशोर मोदी व नाट्य परिषद शाखा अंबाजोगाई च्या सचिव प्रा. संपदा कुलकर्णी यांनी केले आहे.

अंबाजोगाई शहराची ऐतिहासिक सांस्कृतिक परंपरा जोपासन्यासाठी अखिल भारतीय नाट्य परिषद तसेच श्री बालाजी शिक्षण प्रसारक मंडळ हे सदैव नवनवीन सामाजिक , सांस्कृतिक व शैक्षणिक उपक्रम राबविण्यात अग्रेसर असतांना दिसून येतात. अंबाजोगाई शहरात नाटय रसिकांची भूख भागविण्यासाठी श्रीमती संपदा कुलकर्णी व नाट्य परिषदेच्या वतीने सदैव विविध नाटकांचे आयोजन करण्यात येते. अंबाजोगाई नाट्य परिषद ही जिल्हा, विभागीय तसेच राज्यस्तरीय नाट्य स्पर्धेत आपला सहभाग नोंदवून तेथे अंबाजोगाई शहराची एक वेगळी ओळख निर्माण करत असते.

त्याचबरोबर शहरातील श्री बालाजी शिक्षक प्रसारक मंडळ हे देखील अंबाजोगाई शहराच्या शैक्षणिक व सांस्कृतिक वैभवात भर घालनारे शैक्षणिक मंडळ म्हणून नावरूपास आले आहे. या मंडळाच्या वतीने अंबाजोगाई शहर व परिसरातील विद्यार्थ्यांची शैक्षणिक गरज लक्षात घेऊन अनेक शैक्षणिक अभ्यासक्रम सुरू केले आहेत. याद्वारे या परिसरातील विद्यार्थ्यांना अन्य ठिकाणी जाण्याची गरज भासत नाही.

मराठी रंगभूमी दिनाच्या निमित्ताने आयोजित भव्य अशा रांगोळी स्पर्धेत विविध वयोगटातील मुले-मुली, पुरुष व महिला या सहभागी होऊ शकणार आहेत. या स्पर्धेत विजेत्या स्पर्धकांना अनेक आकर्षक बक्षिसांची लयलूट केली जाणार आहे. या स्पर्धेत सहभागी सहभागी होण्यासाठी स्पर्धेच्या ठिकाणी एक तास आगोदर आपली नाव नोंदणी करणे आवश्यक असून आयोजकांचा निर्णय हा अंतिम असेल. तेव्हा मोदी लर्निंग सेंटरच्या प्रशस्त व खुल्या प्रांगणात आयोजित या भव्य रांगोळी स्पर्धेस अंबाजोगाई शहरातील जास्तीत जास्त स्पर्धकांनी सहभागी होण्याचे आवाहन राजकिशोर मोदी व अखिल भारतीय नाट्य परिषद अंबाजोगाई च्या सचिव प्रा संपदा कुलकर्णी यांनी केले आहे.

# मराठवाड्याच्या ग्लोबल आडगाव चित्रपटाने रचला इतिहास

## भारत सरकारच्या गोवा आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात करणार महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व

**परळी । प्रतिनिधी**

मराठवाड्याच्या मातीतील अस्सल कलावंत, लेखक, दिग्दर्शक आणि निर्माता यांचा समावेश असलेल्या ग्लोबल आडगाव या मराठी चित्रपटाने इतिहास रचना असून भारत सरकारच्या वतीने गोवा येथे डिसेंबर मध्ये होणाऱ्या आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवासाठी ग्लोबल आडगाव हा चित्रपट महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व करणार असल्याची घोषणा राज्याचे सांस्कृतिक कार्यमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी नुकतीच केली असून यामुळे सर्वत्र टीम ग्लोबल आडगावचे अभिनंदन व कौतुक होत आहे. या चित्रपटात परळीचे भूमिपुत्र जेष्ठ पत्रकार, लेखक तसेच नाटककार रानबा गायकवाड व प्रसिद्ध लेखक, दिग्दर्शक प्रा. डॉ. सिद्धार्थ तायडे यांच्या भूमिका आहेत.

प्रतिष्ठित गोवा आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाच्या फिल्म मार्केट विभागात महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व करण्यासाठी डॉ. अनिलकुमार साळवे लिखित-दिग्दर्शित ग्लोबल आडगाव या उत्कृष्ट मराठी चित्रपटाची निवड करण्यात आली आहे.या चित्रपटाची निर्मिती शेतकरी पुत्र उद्योजक मनोज कदम, अमृत मराठे यांनी केली असून संत रामदास महाविद्यालयाचे नाट्यशास्त्र विभाग प्रमुख डॉ. सिद्धार्थ तायडे यांनी अभिनय-सहदिग्दर्शन केले आहे.








सांस्कृतिक कार्य मंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी ही घोषणा केली.

अभिनेत्री किशोरी शहाणे, प्रसाद नामजोशी, हर्षित अभिराज, समीर आठल्ये आणि संदीप पाटील यांच्यासह पाच सदस्यांच्या तज्ञ समितीने ३० चित्रपटामधून या चित्रपटाची काळजीपूर्वक निवड केली होती. जोरदार कथा आणि कलात्मक उत्कृष्टतेमुळे ग्लोबल आडगावला

या प्रतिष्ठित चित्रपट महोत्सवात स्थान मिळाले आहे. या चित्रपटाचे निर्माते उद्योजक श्री.मनोज कदम , दिग्दर्शक डॉ अनिलकुमार साळवे आणि सहनिर्माते अमृत मराठे,सहदिग्दर्शक डॉ. सिद्धार्थ तायडे,कलावंत रानबा गायकवाड यांचेसह सिल्व्हरओक फिल्म्स अँड एन्टरटेन्मेंट च्या सर्व कलावंतांचे अभिनंदन होत आहे. प्रदर्शनापूर्वीच गुलाब आडगाव या चित्रपटाने राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय पातळीवरील अनेक प्रतिष्ठित फिल्म

### परळीचे भूमीपूत्र डॉ.सिध्दार्थ तायडे व रानबा गायकवाड यांच्या भूमिका

फेस्टिवल मध्ये आपला ठसा उमटविला आहे. लवकरच हा चित्रपट सिने रसिकांच्या भेटीला येणार आहे. महाराष्ट्राचे प्रतिनिधीत्व करण्यासाठी आंतरराष्ट्रीय महोत्सवात चित्रपटाची निवड झाल्याबद्दल डॉ. सिद्धार्थ तायडे व रानबा गायकवाड यांचे अभिनंदन स्वामी रामानंद शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष माजी आमदार शिवाजीराव चोथे, उपाध्यक्ष डॉ. संभाजी चोथे, सचिव विनायक चोथे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. के. परदेशी, उपप्राचार्य प्रा. प्रमोद जायभाये ,प्रा. भगवान मिरकड ,राजकिशोर मोदी,चंदुलाल बियाणी,बाजीराव धर्माधिकारी, भास्कर नाना रोडे,प्रा. दासू वाघमारे, विधिज्ञ दिलीप उजगरे, प्रोफे. संजय जाधव ,अनंत इंगळे ,बालासाहेब इंगळे,प्राचार्य डॉ. रमेश इंगोले, प्रा. शंकर शिनगारे, डॉ. बबन मस्के, बा. सो. कांबळे,विकास वाघमारे, यांचेसह सिने नाट्य कलावंत संघटनेतील सर्व कलावंतांनी अभिनंदन केले आहे.

# अंबाजोगाई पिपल्स बँकेच्या मुख्य कार्यकारी अधिकारीपदी धनंजय देशपांडे

अंबाजोगाई -:प्रतिनिधी केवळ अंबाजोगाई शहरातच नव्हे तर महाराष्ट्रातील सहकार क्षेत्रात अग्रगण्य असलेल्या अंबाजोगाई पिपल्स को ऑप बँकेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी पदी धनंजय देशपांडे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. संजय जड यांच्या अकाली निधनामुळे अंबाजोगाई पिपल्स बँकेचे मुख्य कार्यकारी पद रिक्त झाले होते. त्यामुळे या पदावर धनंजय देशपांडे यांनी नियुक्ती करण्यात आली आहे.

धनंजय देशपांडे हे जनता सहकारी बँक पुणे येथे उप-महाव्यवस्थापक म्हणून कार्यरत होते. त्यांनी जनता सहकारी बँकेत एक कुशल प्रशासक म्हणून कार्य केले



आहे.ते सेवानिवृत्त झाल्यानंतर त्यांच्या प्रशासकीय कामाचा व अनुभव लक्षात घेऊन त्यांच्या अनुभवाचा फायदा पिपल्स बँकेच्या उन्नतीसाठी पर्यायाने ग्राहकांच्या उन्नतीसाठी अंबाजोगाई पिपल्स बँकेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी या पदावर बँकेचे संस्थापक अध्यक्ष राजकिशोर मोदी व बँकेच्या संचालक मंडळाने त्यांची नियुक्ती केली आहे.

सहकार क्षेत्रातील व बँकिंग क्षेत्रातील मोठा अनुभव असणाऱ्या देशपांडे यांनी पिपल्स बँकेची धुरा आपल्या हाती घेतली आहे. मागच्या २८ वर्षापूर्वी स्थापन झालेल्या अंबाजोगाई पिपल्स बँकेचा विस्तार महाराष्ट्रातील पुणे, अहमदनगर, छत्रपती संभाजीनगर, धाराशिव, जालना, लातूर या जिल्ह्यासह अनेक ठिकाणी झाला आहे. आजमितीला बँक आपल्या १८शाखांच्या माध्यमातून ग्राहकांना सेवा देत आहे.तसेच यापुढेही विविध ठिकाणी बँकेच्या नवीन शाखा प्रस्तावित आहेत. धनंजय देशपांडे यांच्या झालेल्या नियुक्ती बद्दल अंबाजोगाई पिपल्स बँकेचे अध्यक्ष राजकिशोर मोदी यांनी धनंजय देशपांडे यांचे अभिनंदन करत त्यांच्या सन्मान केला. यावेळी बँकेचे उपाध्यक्ष प्रकाश सोळंकी,संचालक अँड. विष्णुपंत सोळंके, प्रा.वसंतराव चव्हाण, पुरुषोत्तम चोकडा, यांच्यासह बँकेचे सर्व संचालक व कर्मचारी उपस्थित होते.

### या नियुक्तीमुळे बँकेच्या अर्थकारणाला नवी दिशा मिळेल - राजकिशोर मोदी

अंबाजोगाई पिपल्स बँकेच्या स्थापनेपासून बँकेने सहकार क्षेत्रात अनेक नवनवीन प्रयोग केले आहेत. सामान्य ग्राहक हा केंद्रबिंदू मानून उच्च पातळीवरील सेवा देण्याचा प्रयत्न वेळोवेळी केला असल्याची भावना राजकिशोर मोदी यांनी व्यक्त केली आहे. आजपर्यंत ग्राहकांच्या विश्वासावरच बँकेची वाटचाल सुरू असून नवीन मुख्य कार्यकारी अधिकारी धनंजय देशपांडे यांच्या नियुक्तीने बँकेच्या अर्थकारणाला नवी दिशा मिळेल अशी अपेक्षा बँकेचे संस्थापक राजकिशोर मोदी यांनी यावेळी व्यक्त केली.

# दिवाळी सुट्ट्यामध्ये जिल्हा शिक्षण विभागाने एकवाक्यता आणावी -बा. म. पवार

आष्टी (प्रतिनिधी);-मराठवाडा विभागासह महाराष्ट्रातील इतर जिल्ह्यांमध्ये वर्षभरातील सुट्टींचे नियोजन करून दिवाळीची सुट्टी जाहीर केली जाते.त्याप्रमाणे बीड जिल्ह्यातही एकूण सुट्ट्यांसह दिवाळीची सुट्टी जाहीर करण्याची मागणी शिक्षक नेते बा म पवार यांनी केली आहे.

बीड जिल्ह्यामध्ये जिल्हा शिक्षण अधिकाऱ्यांनी व्हाट्सअप या सामाजिक माध्यमाद्वारे दिवाळीची सुट्टी हीसहा नोव्हेंबर ऐवजी ९ नोव्हेंबर पासूनदेण्यात येत असल्याचे संदेश पाठवला.या संदेशामुळे मुख्याध्यापकांसह शिक्षकांमध्ये संभ्रम निर्माण झाला आहे.

२६ ऑगस्ट रोजी चे शिक्षण आयुक्त कार्यालयाचेशिक्षण संचालकांना लिहिलेल्या पत्राच्याअनुषंगाने बीड जिलहयामधयेहीसुट्टी हा होऊ केला असल्याचे बोलले जाते.मात्र यासंदर्भात अद्याप अधिकृत पत्रनसल्याने संभ्रम निर्माण झाला आहे.

राज्यामध्ये दिवाळी सुट्टी मध्येएक वाक्यता यावी यासाठी महाराष्ट्र पुरोगामी शिक्षक संघटना यांच्या पदाधिकाऱ्यांनी दिलेल्या पत्राच्या आधारे हे पत्र काढण्यात आले आहे.२६ ऑगस्टला हे पत्र दिल्यानंतर त्याची अंमलबजावणी होण्यासाठी एवढा उशीर का लागण्यात आला तसेचउद्या सुट्या जाहीर होणार आणि आज यामध्ये बदल केलाला जात आहे.त्यामुळे शिक्षण विभागांमध्ये एक वाक्यता आणणे गरजेचेअसल्याचे पवार यांनी म्हटले आहे.

शिक्षण आयुक्ताच्या निर्णयानुसार जर राज्यामध्ये दिवाळी सुट्टी संदर्भात एक वाक्यता असेलल तरमराठवाडा विभागातील परभणी व नांदेड जिल्हा परिषदेने ३ नोव्हेंबर रोजी काढलेल्या पत्रानुसार सहा नोव्हेंबरासूनदिवाळी सुट्ट्या देण्यात येणार असल्याचे सांगितले आहे.तसेच या पत्रामध्येवर्षभरातील कार्य दिवस आणि सुट्टीचे दिवस याची बेरीज वजाबाकी ही देण्यात आली आहे. त्यामुळे बीड जिल्हा परिषदेने सुद्धा वर्षभरातील सुट्ट्यांचा हिशोबताळमेळ लावून सुट्टी जाहीर करण्याची मागणी त्यांनी केली आहे. बीड जिल्ह्यात नाताळ आणि पोळा यांच्यासह गणपतीच्या सुट्ट्याही दिलेल्या नसतात.त्या इतर जिल्ह्यांमध्ये मात्र घेतल्या जातात.या सर्वांचा हिशोब पाहताजिल्हा परिषद शिक्षण विभागाने सुट्ट्या जाहीर करण्याची मागणीत्यांनी केली आहे.

# सुभद्राबाई अघाव यांचे अल्पशा आजाराने दु:खद निधन

परळी (प्रतिनिधी):- महात्मा जोतिबा फुले शिक्षक पतसंस्थेचे अध्यक्ष तथा मराठवाडा शिक्षक संघाचे केंद्रीय कार्यकारणी सदस्य बंडू अघाव यांच्या मातोश्री सुभद्राबाई भगवानराव अघाव यांचे नुकतेच मंगळवार, दि.३१ ऑक्टोबर २०२३ रोजी पहाटे लातूर येथील दवाखान्यात उपचार घेत असताना अल्पशा आजाराने दु:खद निधन झाले. मृत्यू समयी त्यांचे वय वर्षे ७३ होते.

त्यांच्या पार्थिवावर मंगळवार रोजी येथील वैद्यनाथ धाम स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले.यावेळी मोठा जनसमुदाय उपस्थित होता. सुभद्राबाई या अध्यात्मिक, धार्मिक वृत्तीच्या व अत्यंत मनमिळाऊ स्वभावाच्या होत्या. त्या सतत हसतमुख असायचा घरी येणारा जाणारांचे त्या मोठ्या आनंदाने व उत्साहाने आदरातिथ्य करायच्या. म्हणून त्या सर्वांच्या



आवडीच्या होत्या. त्यांच्या या आकस्मिक जाण्याने सर्वत्र हळहळ व्यक्त करण्यात येत आहे. त्यांना १९९० साली कँसर सारखा दुर्धर आजाराने ग्रासले होते. त्याच्यावर त्यांनी मोठ्या हिंमतीने मात केली होती. त्यांच्या पश्चात चंद्रकांत, बंडू, शिवाजी हि तीन मुले तर मनोरमा, वनमाला, वंदना या सुना यांच्यासह मकरंद, प्रतीक्षा, आकांक्षा, वैष्णवी, प्रितम, यशश्री ही नातवंडे तर अवनी हे पतरूंड असा भरगच्च परिवार आहे.

# होम मिनिस्टर स्मार्ट मिनिस्टरमध्ये सहा ते शहात्तर वयाच्या आजीबाईने केली फुल्ल टू धमाल

**बीड । प्रतिनिधी**

श्री महालक्ष्मी सिल्क साडी व हिरकणी ग्रुपने आयोजीत केलेले होम मिनिस्टर स्मार्ट मिनिस्टर कार्यक्रमात अनेक महिलांनी फुल्ल टू धमाल करत मनमुराद नृत्य करत हासत-खेळत आनंद लुटला.निवेदक सुरेश साळुंकेंचा लोकप्रिय होत आसलेला आडोतीसवा होम मिनिस्टर स्मार्ट मिनिस्टर प्रयोग पहाण्यासाठी व सहभागी होण्यासाठी बीड शहरातील महिलाची खचाखच गर्दी झाली होती.संगीत खुर्ची,तळ्यात मळ्यात,अभिनय,नृत्य, उखाणे,माईम,बलुन फाईट,नवरस डायलॉग,स्पिडेड स्पीक सारख्या नाविन्यपूर्ण खेळामुळे हास्यरस ओसंडून वाहत होता.तर सुरेशभाऊजींच्या हजरजबाबीपणामुळे कार्यक्रमातला प्रत्येक प्रसंग विनोदी नवरंगाने नटत होता.प्रत्येक इव्हेंटमध्ये स्त्रीया उत्स्फूर्तपणे सहभागी होऊन मोठ्या उत्साहात गेम खेळत होत्या.तर आऊट झाल्यावर हि खिलाडूवृत्तीने उर्वरित महिलांना प्रोत्साहन देत खेळण्याचा आनंद लुटत होत्या.या होम मिनिस्टर स्मार्ट मिनिस्टराचे वैशिष्ट्य म्हणजे अबालवृद्ध महिलां

साठी कार्यक्रम डिझाईन केल्यामुळे अगदी वय वर्षे चार असलेल्या कु.वीरा खटोड या चिमुकलीसह शहात्तर वर्षाच्या वयोवृद्ध सौ.शोभा शहाणे या आजीबाईसुध्दा



सहभग घेऊन कार्यक्रमात हम भी कुछ कम नहि हे दाखवुन दिले.कार्यक्रम संपल्यानंतर स्त्रीयांनी होम मिनिस्टर स्मार्ट मिनिस्टरच्या साध्या सोप्या आणि ज्ञानपुरक डिझाईनचे कौतुक केले तर उत्कृष्ट कार्यक्रम सादर केल्याबद्दल बीड जिल्हा योग समितीचे अध्यक्ष ड.श्रीरामजी लाखे,रत्नाकर कुलकर्णी,यांनी कार्यक्रमाचे निर्माते सुरेश भाऊंजींचे अभिनंदन मानले.या कार्यक्रमाचे आनखी एक वैशिष्ट्य म्हणजे आजी,आई व नात एकमेकीच्या स्पर्धक होऊन खेळत होत्या त्यामुळे प्रत्येक खेळात चुरस होती तर सुरेश भाऊजींच्या हजरजबाबीपणामुळे कार्यक्रमात वेगळीच रंगत वाढत होती.यावेळी संयोजन समितीच्यावतीने होम मिनिस्टर स्मार्ट मिनिस्टरचे निर्माता सुरेश साळुंकेंचा सत्कार अखिल भारतीय नाट्य परिषदेच्या कार्यकारिणी सदस्या तथा माजी नगराध्यक्षा डॉ.दिपाताई क्षीरसागर,

झुंजारनारी मंचच्या अध्यक्षा तथा झुंजार महिलाजगत पुरवणीच्या संपादिका आशाताई वरपे व कल्पतरूच्या सचिव डॉ.सरिकाताई क्षीरसागर यांच्या शुभहस्ते करण्यात आला.होम मिनिस्टर स्मार्ट मिनिस्टर कार्यक्रमात लाईव म्युझिकचीबाजु प्रा.सचिन राऊत व कागदे तर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी हिरकणी ग्रुपच्या अध्यक्षा हेमा विभूते,रिच इव्हेंटच्या रुपा देशपांडे, प्रा.अनिता शिंदे,सविता जैन,सुचिता राजेंद्र, मनीषा कुलकर्णी,माधुरी शोत्रे,सरवदे यांनी विशेष परिश्रम घेतले.

# डॉ.सय्यद हुमायुद्दीन डेंटल फेलोशिपमध्ये सर्वप्रथम

आष्टी । प्रतिनिधी

आष्टी तालुक्यातील मौजे चिंचाळा येथील डॉ.सय्यद हुमायुद्दीन अल्लाउद्दीन त्यांनी प्रसिद्ध शासकीय दंत महाविद्यालय,घाटी औरंगाबाद येथून इन मायक्रो डेंटिस्ट्री अँड इंडो डॉनटीक्स या फेलोशिप मध्ये सर्वप्रथम येण्याचे नेत्रदीपक यश संपादन केली आहे. कवी प्रा.सय्यद अल्लाउद्दीन यांचे ते चिरंजीव आहेत.फेलोशिप सर्वप्रथम येण्याचा मान मिळवल्याबद्दल त्यांचे आ.सुरेश धस,आ.बाळासाहेब आजबे,माजी आ.भीमराव धोंडे,माजी आ.साहेबराव दरेकर,संस्थाध्यक्ष किशोर नाना हंबर्डे,अतुल सेठ मेहेर,डॉक्टर असोसिएशनचे अध्यक्ष डॉ.विलास सोनवणे,डॉ.मधुकर हंबर्डे, डॉ.अब्दुल



मुजाहिद,डॉ.राहुल टेकाडे,सुखलालजी मुथा,अनंत हंबर्डे,प्राचार्य डॉ.सोपानराव निंबोरे,नामदेव भाऊ राऊत,हाजी शेख हरूण सेठ,विजुभाऊ गोल्हार,नगराध्यक्ष जिया बेग,प्रफुल्ल भाऊ सहस्त्रबुद्धे,उत्तम बोडखे,चिंचाळा येथील सरपंच पंडित पोकळे,सर्व ग्रामस्थ यांनी अभिनंदन केले आहे.

राज्य लोकतंत्र शनिवार दि.०४ नोव्हेंबर-२०२३ | ६

# आता मिळणार प्रत्येक शेतकऱ्याला पीएम किसान योजनेचा लाभ

## महाराष्ट्रात प्रथमच बीडमध्ये राबविला जाणार शेतकऱ्यांसाठी पायलट प्रोजेक्ट

**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांसाठी शासनाच्या वतीने पायलट प्रोजेक्ट राबविण्यात येत असून या प्रोजेक्टमुळे जिल्ह्यातील प्रत्येक शेतकऱ्याला पीएम किसान योजनेचा लाभ मिळेल, याशिवाय प्रत्येक शेतकऱ्याचे जमिनीचे क्षेत्र ई-केवायसी अपडेट होणार आहे. त्यामुळे सध्या जरी या शेतकऱ्याला लाभ मिळत नसला तरी हा प्रोजेक्ट पूर्ण झाल्यानंतर सर्वांना त्याचा लाभ मिळणार आहे. देशातील ७ जिल्ह्यापैकी महाराष्ट्रातील एकमेव बीड जिल्ह्याचा समावेश या पायलट प्रोजेक्टमध्ये करण्यात आला असून एका महिन्यात हे काम पूर्ण करण्याचा कालावधी असल्याची माहिती जिल्हाधिकारी दिपा मुधोळ मुंडे यांनी पत्रकार परिषदेत दिली. यावेळी अप्पर जिल्हाधिकारी कुलकर्णी



तसेच या प्रोजेक्टवर देखरेख करणारे केंद्राचे पाटील उपस्थित होते.

यावेळी माहिती देताना जिल्हाधिकारी दिपा मुंडे यांनी सांगितले की, महाराष्ट्रामध्ये प्रायोजित तत्वावर बीड जिल्ह्यामध्ये हा प्रयोग होणार असून प्रत्येक गावाला दोन व्यक्ती हा डाटा गोळा करतील. संबंधित सज्जाचे तलाठी व त्यांना एक सहाय्यक असणार आहे. या प्रोजेक्टमुळे प्रत्येक शेतकऱ्याला प्रत्येक योजनेचा लाभ मिळणार असून ई-केवायसीचा प्रश्न आपोआपच सुटणार आहे. यासंदर्भात कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देण्यात येणार असून हे प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर प्रत्यक्षात काम सुरू करण्यात येणार आहे. एखाद्या शेतकऱ्याने जमीन विकली तर ती त्याची नोंद आपोआपच विकत घेणाऱ्याच्या नावावर होणार आहे, त्यामुळे शेतकऱ्यांना लाभ देताना सोयीचे होणार आहे. ज्यावेळी यासंदर्भात गावामध्ये कॅम्प असेल त्यावेळी शेतकऱ्यांनी उपस्थित रहावे असे आवाहन जिल्हाधिकाऱ्यांनी केले आहे. या योजनेमुळे पीएम किसान योजनेचे उद्दिष्ट लागवडीयोग्य क्षेत्र असलेल्या शेतकरी कुटुंबांना शेती आणि संलग्न कामासाठी आर्थिक सहाय्य देणे, नोंदणीकृत लाभार्थ्यांचे तपशील पडताळणी करणे, पात्र लाभार्थी शेतकऱ्यांना शोधून त्यांच्या नोंदी करणे, लाभार्थ्यांची संमती घेणे, जमिनीच्या नोंदीची वैधता तपासणे, बँक खाती त्यांच्या आधार क्रमांकाशी लिंक करणे, शेतकऱ्यांची फार्मर रजिस्ट्रीमध्ये नोंद करणे, शेतकऱ्यांना आर्थिक मुदत पोहोचल्याची खात्री करून घेणे, आदी बाबी समाविष्ट करण्यात आल्या असून यामुळे शेतकऱ्यांना पीएम किसान योजनेचा लाभ देणे सोयीचे होणार आहे. या योजनेसाठी प्रत्येक शेतकऱ्यांनी आपल्या गावातील शिबिराला उपस्थित रहावे असे आवाहन जिल्हाधिकारी दिपा मुधोळ मुंडे यांनी केले आहे.

# संजय लाटकर यांना गृहमंत्र्यांचे विशेष मेडल

बीड (प्रतिनिधी) झारखंडचे अतिरिक्त पोलिस महासंचालक (ऑपरेशन) संजय लाटकर यांना केंद्रीय गृह मंत्रालयाच्या वतीने दिले जाणारे केंद्रीय गृहमंत्री विशेष ऑपरेशन मेडल जाहीर झाले आहे. या पूर्वी त्यांचा राष्ट्रपतींच्या तीन पदकासह वेगवेगळ्या दहा पदकांनी सन्मान झालेला आहे. मराठवाड्यातील मूळचे नांदेडचे रहिवासी असलेले संजय लाटकर हे लोकनेते स्व. मा.आ. विनायकराव मेटे यांचे मेव्हणे आणि डॉ. ज्योती मेटे यांचे बंधू आहेत.



संजय लाटकर हे १९९५ बॅचचे आयपीएस अधिकारी आहेत. पोलिस अधीक्षक म्हणून आतापर्यंत बिहार व झारखंडच्या सात जिल्ह्यात काम केले आहे. तसेच महाराष्ट्रातही त्यांनी लातूरसह दोन जिल्ह्यात काम केले आहे. लातूर जिल्ह्याला त्यांनी तंटामुक्त गाव मोहिमेत राज्यात पहिल्या क्रमांकावर आणले होते. महाराष्ट्राच्या एटीएसमध्ये देखील त्यांनी काम केले आहे. सीआरपीएफचे पोलिस महानिरीक्षक म्हणून त्यांनी गडचिरोली, मुंबई तसेच रांची येथेही काम केले आहे. सध्या ते झारखंड येथे अतिरिक्त पोलिस महासंचालक म्हणून कार्यरत आहेत त्यांच्या नेतृत्वात छत्तीसगडच्या सीमेवर बुडा पहाड़ या भागात मोहीम राबविण्यात आली. गेल्या वर्षांपासून १०० पेक्षा अधिक नक्षलवाद्यांचे या भागात वास्तव्य आहे. अशा ठिकाणी ऑगस्ट २२ मध्ये ऑपरेशन ऑक्टोपस राबविण्यात आले. ऑपरेशन फेब्रुवारी २३ पर्यंत म्हणजे सहा महिने चालले होते. यात अनेक नक्षलवाद्यांचा बिमोड करण्यात आला. अनेक जण शरण आले. या ठिकाणी ७०० भूसुरुंग, २३ मोठे हत्यार, दोन हजार पेक्षा अधिक काडतुसेही जप्त करण्यात आले होते. त्यांच्या कार्याची दखल घेऊन केंद्रीय गृहमंत्रालयाने सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंती निमित्त केंद्रीय गृहमंत्र्यांचे विशेष ऑपरेशन मेडल जाहीर केले आहेत. सात आयपीएस अधिकारी व १६ कर्मचाऱ्यांना हे मेडल जाहीर करण्यात आले आहे.

# असे समाजासाठी कितीही गुन्हे दाखल झाले तर फरक पडत नाही :- लखन गायकवाड

**सिरसाळा । प्रतिनिधी**

तालुक्यातील गोवर्धन हि.येथील रविवारी २९ रोजी गंगाभिषण रामभाऊ मोरे वय ३३ वर्षे याने आपल्या राहत्या घरात गळफास घेऊन आत्महत्या केली होती. मराठा समाजास आरक्षण मिळत नसल्याने आत्महत्या केली होती. त्यानंतर रविवारी संध्याकाळी तीनच्या दरम्यान सिरसाळा येथे डॉ बाबासाहेब आंबेडकर चौकातील त्यांचे पार्थिव ठेवून आंदोलन करण्यात व रस्ता रोको ही करणेत आले.यावेळी पाच तास ठिय्या आंदोलन व जोपर्यंत गंगाभिषण कुटुंबीयांचे पुनर्वसन व शासकीय मदत मिळत नाही, तोपर्यंत अंत्यसंस्कार करणार नसल्याचा पवित्रा आंदोलकांनी घेतला होता चौकात जमवून मृतदेह ठेवणे, रस्ता अडविणे, वाहनांना अडथळा निर्माण केल्याप्रकरणी व अंत्यदर्शनासाठी ठेवलेल्या मृतदेहाची विटंबना झाल्याचे कारण दाखवून पोलिसांनी सोमवारी सिरसाळा येथे पोलिस ठाण्यात आंदोलकांवर गुन्हे दाखल करण्यात आले असे कितीही गुन्हे दाखल झाले तर फरक पडत नाही लखन गायकवाड ने म्हटले आहे.



गंगाभिषण रामभाऊ मोरे वय ३३ वर्षे याने आपल्या राहत्या घरात गळफास घेऊन आत्महत्या केली होती.

मृतदेहाची विटंबना झाल्याचे कारण दाखवून पोलिसांनी कमीत कमी मयतचे सख्ख्या भावावर व काही शिक्षकवर तरी गुन्हा दाखल नव्हता करायला पाहिजे.

# कुणबी, मराठा जात प्रमाणपत्र देण्याची प्रक्रिया सुरू

**बीड । प्रतिनिधी**

मराठवाडयातील मराठा समाजास मराठा - कुणबी, कुणबी मराठा, कुणबी जात प्रमाणपत्र देण्याची प्रक्रिया जिल्हाधिकारी कार्यालयकडून सुरू करण्यात आली आहे

न्यायमूर्ती श्री. संदीप शिंदे (निवृत्त) यांचे अध्यक्षतेखाली मराठवाडयातील मराठा समाजास मराठा - कुणबी, कुणबी मराठा, कुणबी जात प्रमाणपत्र देण्यासाठी समिती स्थापन करण्यात आली.



त्यानुसार जिल्ह्यातील नागरिकांकडे उपलब्ध निजामकालीन पुरावे, वंशावळी, शैक्षणिक पुरावे, महसूली पुरावे, निजाम काळात झालेले करार, निजामकालीन संस्थानिकांनी दिलेल्या सनदी, राष्ट्रीय दस्तावेजच्या आधारावर कुणबी मराठा प्रमाणपत्र वितरीत करण्यात येत आहेत.आज जिल्हाधिकारी कार्यालयात अपर जिल्हाधिकारी डॉक्टर त्रिगुण कुलकर्णी आणि उपजिल्हाधिकारी कविता जाधव यांच्या प्रमुख उपस्थितीत प्रतिनिधी स्वरूपात शुक्रवारी काही लोकांना जात प्रमाणपत्र प्रदान करण्यात आलेली आहेत.

येत्या काळात बीड जिल्ह्यात, शिरूर, गेवराई तालुक्यात विशेष शिबिर लावून जात प्रमाणपत्र उपलब्ध करण्याची कारवाई करण्यात येणार आहे.

# 'हैद्राबाद मुक्तिसंग्राम आणि अंबाजोगाईची शौर्यगाथा' पुस्तक प्रकाशन सोहळ्याचे आयोजन

अंबाजोगाई (प्रतिनिधी)

साहित्य निर्मितीतून राष्ट्रभक्तीचा संचार मनावर व्हावा, राष्ट्रीय विचारांची घुसळण होऊन साहित्य रसिकांना तसेच शालेय विद्यार्थ्यांना हैद्राबाद मुक्तिसंग्रामात अंबाजोगाईच्या स्वातंत्र्यसैनिकांनी गाजवलेले शौर्य ज्ञात व्हावे या हेतूने श्री.खोलेश्वर शैक्षणिक संकुल, अंबाजोगाईने तयार केलेल्या 'हैदराबाद मुक्तिसंग्राम आणि अंबाजोगाईची शौर्यगाथा' या पुस्तकाच्या प्रकाशन सोहळ्याचे आयोजन केलेले आहे. हा प्रकाशन सोहळा उद्या शनिवार दि.४ नोव्हेंबर २०२३ रोजी सकाळी ४.३० वाजता खोलेश्वर माध्यमिक विद्यालयात संपन्न होणार आहे.

या प्रकाशन सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी लातुर येथील प्रसिद्ध इतिहास अभ्यासक प्रा.डॉ.हर्षवर्धन आर्य, इतिहास अभ्यासक गोरक्षनाथ आबुज, भा.शि.प्र.संस्थेचे कार्यवाह डॉ.श्री. हेमंत वैद्य, रा.स्व.संघ. अंबाजोगाई जिल्हा कार्यवाह बिपीन क्षीरसागर यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. तरी सर्व साहित्यप्रेमींनी या पुस्तक प्रकाशन सोहळ्यासाठी उपस्थित रहावे असे आवाहन श्री.खोलेश्वर शैक्षणिक संकुलाचे अध्यक्ष अध्यक्ष विजय वालवडकर, कार्यवाह तसेच संपादक मंडळाचे किरण कोदरकर, सौ.वर्षाताई मुंडे यांनी केले आहे. सदरील कार्यक्रमाचे आयोजन खोलेश्वर माध्यमिक विद्यालय, अंबाजोगाई येथे करण्यात आले आहे.

# कै.पाटील यांच्या एसटी बसवर लावलेल्या जाहीरातीवर काळा कलर लावल्याबद्दल गुन्हे दाखल करावेत -वकील संघटना

**केज । प्रतिनिधी**

कांतीसुर्य मराठा व हमाली माथाडी कामगारांचे दैवत व नेते कै. आण्णासाहेब पाटिल यांच्या एस.टी. महामंडळावरील लावलेल्या जाहिरातीवरील फोटोला काळा कलर लावून महाराष्ट्र राज्यातील हमाली माथाडी कामगार व सकल मराठा समाजाच्या भावना दुखावल्याबद्दल कलर लावणाऱ्या समाजकंठकावर व संबधितावर तात्काळ गुन्हे दाखल करावेत अशी तक्रार सहाय्यक पोलीस आयुक्त मसूद शेख साहेब व सहाय्यक पोलिस निरीक्षक नरेशजी यांच्याकडे करण्यात आली आहे तसेच तशा आशयाचे निवेदन ठाकरे साहेब यांच्याकडे देण्यात आले आहे,दिनांक २/११/२०२३ रोजी



मी सोशल मीडियावरील मराठा आरक्षणासंदर्भात अपडेट पाहत असताना त्या ठिकाणी एक व्हिडिओ पाहण्यात आला त्यामध्ये एसटी महामंडळ यावरील असलेल्या महाराष्ट्र शासनाच्या जाहिरातीमध्ये क्रांतीसुर्य हमाली माथाडी कामगार नेते व सर्व मराठा समाजाचे दैवत कै अण्णासाहेब पाटील यांच्या बॅनर वर असलेल्या फोटोवर अज्ञात व्यक्तींनी काळा कलर लावलेला असून त्यामुळे महाराष्ट्र राज्यातील हमाली माथाडी कामगार व सकल मराठा समाजाच्या भावना दुखावलेल्या आहेत, कै अण्णासाहेब पाटील यांनी मराठा समाज न्याय हक्कासाठी मराठ्यांना आरक्षण मिळावे म्हणून महाराष्ट्रात पहिला मोर्चा २२ मार्च १९८२ रोजी लाखोंच्या संख्येने मुंबईत मराठा समाजाला घेऊन मंत्रालयावर काढला होता त्यांनी शपथ घेतली होती की माझ्या समाजास आज न्याय मिळाला नाही तर मी उद्याचा सूर्योदय पाहणार नाही असे आपल्या भाषणातून त्यांनी महाराष्ट्र शासनास इशारा दिला होता परंतु ती मागणी पूर्ण न झाल्यामुळे त्यांनी दुसऱ्या दिवशी सकाळी स्वतःच्या रिवाल्वर ने डोक्यात गोळी घालून आपले जीवन संपवले ज्या क्रांतीसुर्याने मराठा समाजासाठी स्वतःचे बलिदान दिले त्यांच्या फोटोला जर कोणी काळे लाऊन विटंबना करत असेल तर महाराष्ट्रातील हमाली माथाडी कामगार व मराठा समाज कदापीही सहन करणार नाही, आज रोजी महाराष्ट्रातील सकळ मराठा समाजाने मोठ्या प्रमाणात आरक्षणासंदर्भात आंदोलन उभे केलेले असताना त्या ठिकाणी क्रांतीसुर्य अण्णासाहेब पाटील यांच्या फोटोस काळे लावने म्हणजे हमाली माथाडी कामगार व मराठा समाजास भडकवण्याचे काम या समाजकंटकामार्फत करण्यात येत असल्याचा संशय आहे,तरी ही व्हिडिओ क्लिप पाहून त्या ठिकाणी असणारे असणारे आंदोलनकर्ते यांचा तपास करून यांच्यावर कड़क कारवाई करून गुन्हे दाखल करण्यात यावेत असे अँड सुधिर चौधरी ,अँड सदानंद सोनुने, अँड पंकज कोकणे, अँड सुजित पाटील, शिवाजी झाम्बरे यांनी म्हटले आहे, अन्यथा यांच्या विरोधात महाराष्ट्र राज्यातील सकल मराठा समाज व हमाली माथाडी कामगार रस्त्यावर उतरून तीव्र आंदोलन करेल.

# सत्यभामा टोणपे यांचे निधन

गेवराई (प्रतिनिधी ) - येथील मेनरोडवरील तेला पेंडीचे व्यापारी कै . भिक्कूलाल टोणपे यांच्या पत्नी गं .भा .सत्यभामा भिक्कूलाल टोणपे यांचे मंगळवार दि ३१ ऑक्टो रोजी दुपारी ४ . ३० वाजता अल्पशा आजाराने निधन झाले . मृत्यूसमयी त्यांचे वय ७३ वर्ष होते . त्यांच्या पार्थिवावर बुधवारी सकाळी १० वा . चिंतामणी स्मशानभूमी येथे अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत . सुभाषराव टोणपे यांच्या त्या भावजयी होत्या तर हॉटेल व्यावसायिक देविदास शिंदे गुंजकर यांच्या त्या मामी होत्या . स्व . सत्यभामाबाई यांच्या निधनामुळे सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे .



# आमदार प्रकाश सोळंकेंना फोनाफोनी करणारा धुनकवडचा सुंदर भोसले पोलिसांच्या ताब्यात

**बीड । प्रतिनिधी**

राष्ट्रवादी अजित पवार गटाचे आमदार प्रकाश सोळंके यांच्या घरावर दगडफेक करण्यात आली. तसेच, सोळंकेंच्या बंगल्याच्या आवारात उभ्या असलेल्या गाड्याही मराठा आंदोलकांनी जाळल्या. प्रकाश सोळंकेंच्या व्हायरल ऑडिओ क्लिपवरून मराठा आंदोलका आक्रमक झाले. सोळंकींच्या घरावरील दगडफेक प्रकरणी पोलिस ॲक्शन मोडमध्ये आले असून आमदार प्रकाश सोळंके यांच्याशी संवाद साधणार्या सुंदर भोसलेला पोलिसांनी घेतले ताब्यात घेण्यात आले.

एका मराठा आंदोलकानं अजित पवार गटाचे आमदार प्रकाश सोळंकेंना फोन केला आणि मराठा आरक्षणाबाबत चर्चा सुरू केली. याच ऑडिओ क्लिपमध्ये बोलताना आमदार प्रकाश सोळंकेंनी मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांच्याबाबत वक्तव्य केलं होतं. त्याच वक्तव्यावरून राडा झाला झाला. प्रकाश सोळंके यांच्यांशी साधलेल्या संवादाची



ऑडिओ क्लिप व्हायरल झाल्यामुळे प्रकाश सोळंके यांच्या बंगल्यावर मोठा जमाव दगडफेक करत जाळपोळ करत होता. सुंदर भोसले हा धारूर तालुक्यातील धूनकवड येथील रहिवासी आहे. रात्री उशिरा सुंदर भोसले याला माजलगाव पोलिसांनी घरातून ताब्यात घेतले आहे. एक मराठा आंदोलकानं आमदार प्रकाश सोळंकेंना फोन केला आणि मराठा आरक्षणाच्या मुद्द्यावर चर्चा केली. मुदतीचे ४० दिवस संपल्याची आठवण प्रकाश सोळंकेंना मराठा आंदोलकानं करुन दिली. त्यानंतर प्रकाश सोळंके म्हणाले की, कोण म्हटलं सरकार आरक्षण देत नाही. ४० दिवस झाले म्हणून काय झालं? हे आरक्षण देऊन कोर्टात अडकवून ठेवायचं का परत? अशी आडमुठी भूमिका घेऊन चालत नाही, शासन देण्याचा प्रयत्न करत आहे. फक्त दिलेलं आरक्षण कोर्टात टिकलं पाहिजे, एवढंच शासनाचं म्हणणं आहे. त्यादृष्टीनं जे काही आवश्यक आहे, ते सर्व शासन करतंय. शासनानं समिती नेमली आहे, त्या समितीचा अहवाल घेऊन शासन आरक्षण देणार आहे.

प्रकाश सोळंकेंच्या घरावर मराठा आंदोलकांची मोठी दगडफेक

राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे आमदार प्रकाश सोळंके यांच्या माजलगाव येथील घरावर मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी आंदोलकांची दगडफेक करण्यात आली होती. सुमारे एक ते दीड तास दगडफेक सुरू होती. आंदोलकांनी सोळंकेंच्या बंगल्याच्या आवारात असलेल्या गाड्याही जाळल्या. प्रकाश सोळंकेंच्या बंगल्यातून धुराचे लोळ येत असल्याचं पाहायला मिळत होते. त्यावेळी आमदार प्रकाश सोळंके घरातच उपस्थित होते.

# बीडमधील जाळपोळ प्रकरणी १३४ संशयितांना अटक

**बीड । प्रतिनिधी**

जिल्ह्यात सोमवारी झालेल्या जाळपोळ आणि दगडफेकीच्या घटना पूर्वनियोजित असल्याचे पुन्हा स्पष्ट झाले आहे. जाळपोळ आणि तोडफोडीचे साहित्य दोन वाहनांतून आल्याची धक्कादायक माहिती पोलीस तपासात समोर आली आहे. दोन्ही हिंसक घटनामधील दाखल एकूण २० गुन्ह्यांत पोलिसांनी आतापर्यंत १३४ संशयितांना अटक केली आहे. तर, फुटेजच्या माध्यमातून या घटनांतील सहभागी असणाऱ्या आणखी १५० वर संशयितांची ओळख पोलिसांनी पटविली आहे.

मनोज जरांगे पाटील यांनी सुरू केलेल्या उपोषणाच्या समर्थनार्थ जागोजागी आंदोलने सुरू होती. शनिवार २८ ऑक्टोबरपासून हिंसक घटना घडू लागल्या. यात सोमवारी (३० ऑक्टोबर) रोजी जिल्ह्यात नेत्यांच्या घरांना, कार्यालयांना तसेच इतर प्रतिष्ठानांना आग लावणे व दगडफेक केल्याप्रकरणी जिल्ह्यात १५ गुन्हे नोंद झाले आहेत. तर, याआधी अशाच घटनांप्रकरणी ५ गुन्हे नोंद झाले आहेत.

या गुन्ह्यांत पोलिसांनी २७५ संशयितांची ओळख पटविली आहे. आता पोलिसांनी ताब्यात घेतलेल्यांची संख्या १३४ वर पोहोचली आहे. संशयितांची विचारपूस आणि पोलिसांचा तपास यातून अनेक बारकावे आणि धक्कादायक बाबी समोर येत आहेत. मराठा आरक्षण आंदोलनाच्या माध्यमातून मोठमोठ्या नेत्यांची घरे, अस्थापना टार्गेट करण्याचे नियोजन काही मंडळींनी केल्याचे समोर आले आहे. त्यांची नावेही पोलिसांना मिळाली असली तरी प्रमुख मंडळींनी मोबाइल बंद करून बाहेर पळ काढला आहे.

# ॲड.संदीप रुपनर यांचे अपघाती निधन

परळी / प्रतिनिधी

भरधाव वाहनाने दुचाकीला दिलेल्या धडकेत अंबाजोगाई न्यायालयातील ऍड. संदीप नवनाथ रुपनर (वय २४, रा. ममदापुर, ता. परळी) यांचा जागीच मृत्यू झाला. हा अपघात आज शुक्रवारी (दि. ०३) दुपारी २ वाजताच्या सुमारास मांडेखेल शिवारात झाला.

ऍड. संदीप रुपनर यांनी सामान्य परिस्थितीतून पुढे येत वकिलीचे शिक्षण घेतले. अत्यंत कमी कालावधीत त्यांनी उत्कृष्ट कार्यपद्धतीमुळे वकिली क्षेत्रात चांगले नाव कमावले होते. ते शुक्रवारी दुपारी परळी न्यायालयातील कामकाज आटोपून अंबाजोगाई न्यायालयात येण्यासाठी निघाले होते. मार्गात मांडेखेल शिवारात समोरून



येणाऱ्या वाहनाने त्यांच्या दुचाकीला जोरदार धडक दिली. या अपघातात त्यांचा जागीच मृत्यू झाला. या अपघाताची माहिती मिळताच अनेक वकील बांधवानी स्वाराती रुग्णालयाकडे धाव घेतली. ऍड. संदीप रुपनर यांच्या मृत्यूमुळे एक उमदा तरुण सहकारी गमावला अशी भावना वकील संघाकडून व्यक्त होत आहे.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Indradhanushya Printers and Publishers, Mondha Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske, Executive Editor Dr. Balasaheb Pingale. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी इंद्रधनुष्य प्रिंटर्स अ‍ॅण्ड पब्लिशर, मोंढा रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजिव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com

# कैवल्यधाम संस्थेच्या शताब्दी वर्ष प्रित्यर्थ १०० रु. कॉइनचे अनावरण

**पुणे । प्रतिनिधी**

दि.१ नोव्हेंबर रोजी थीश्रव ढीरवश उशर्पीश येथे १०० रु कॉइन चे अनावरण भारतीय रिझर्व बँकेचे सन्मानीय गव्हर्नर श्री शक्तिकांता दास यांच्या शुभ हस्ते करण्यात आले. लोणावळा येथे १९२४ साली स्वामी कुवलयानंद जी यांनी कैवल्यधाम योग संस्थेची स्थापना केली होती.

कैवल्यधाम योग संस्था २०२३-२४ मध्ये आपले शताब्दी वर्ष साजरे करीत असून २०२४ साली आपली शतकपूर्ती करीत आहे. याचे औचित्य साधून कैवल्यधाम संस्थेच्या शताब्दी वर्ष ( १९२४-२०२४ ) प्रित्यर्थ

१०० रुपयांचे नाणे ( १०० ठी. उेळपी ) यांचे अनावरण बुधवार दिनांक १ नोव्हेंबर २०२३ रोजी World Trade Center, South Lounge Ground Floor, मुंबई येथे सायंकाळी

भारतीय रिझर्व्ह बँकेचे सन्मानीय अध्यक्ष श्री शक्तिकांता दास यांच्या शुभ हस्ते करण्यात आले. यावेळी कैवल्यधाम -वींळीी व त्रेींशीपळपस इेवू चे सभासद, संस्थेचा अधिकारी वर्ग, विविध क्षेत्रातील मान्यवर

व्यक्ती तसेच मुंबई व लोणावळा शहरातील पत्रकार मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यकमाची सुरुवात शांतीपाठ आणि दिपप्रज्वलन करून करण्यात आली. कैवल्यधाम संस्थेचे मानद सचिव प्रमुख कार्यकारी अधिकारी श्री सुबोध तिवारी यांनी स्वागतपर भाषण केले आणि भारतीय रिझर्व्ह बँकेचे सन्मानीय गव्हर्नर श्री शक्तीकांत दास तसेच कैवल्यधाम शताब्दी वर्ष कमिटीचे अध्यक्ष व माजीं केंद्रीय रेल्वे मंत्री सन्मानीय श्री सुरेश प्रभू यांना शाल, पुष्पगुच्छ व स्वामी कुवलयानंद जी यांची मूर्ती देऊन सन्मानित केले. या प्रसंगी Journey of Kaivalyadhama Yogic Science: -n Odyssey of 100 Years ( Documentary ) हा माहितीपट संक्षिप्त स्वरुपात दाखविण्यात आला.






कैवल्यधाम शताब्दी वर्ष कमिटीचे अध्यक्ष आणि माजी केंद्रीय रेल्वे मंत्री सन्मानीय श्री सुरेश प्रभू यांनी योगाचे महत्व आपल्या भाषणातून पटवून दिले. कैवल्यधाम मुंबई शाखेचे संयुक्त संचालक ( गेळपीं ऊळीशर्ली ) श्री रवी दीक्षित यांनी संक्षिप्त स्वरूपात अगदी सोप्या पद्धतीने उपस्थितांचा योगाभ्यास घेतला. यानंतर भारतीय रिझर्व्ह बँकेचे सन्मानीय गव्हर्नर श्री शक्तीकांता दास यांच्या शुभहस्ते कैवल्यधाम संस्थेच्या शताब्दी वर्ष (१९२४-२०२४ ) प्रित्यर्थ १०० रुपयांची नाणे (100 Rs. Commemorative Coin ) यांचे अनावरण करण्यात आले. त्यांनी कैवल्यधाम संस्थेच्या शताब्दी वर्षास आणि पुढील यशस्वी वाटचालीस शुभेच्छा दिल्या. १०० वर्ष पूर्ण करीत असलेल्या कैवल्यधाम संस्थेच्या शताब्दी वर्षाचे उेळप चे अनावरण करण्याचे भाग्य मला लाभले अशी भावना त्यांनी व्यक्त केली. तसेच लोणावळा येथील कैवल्यधाम संस्थेस भेट देण्याची इच्छा दर्शविली. याप्रसंगी उद्योगपती श्री नानिक रूपाणी यांनी कैवल्यधाम संस्थेस देणगी दिली. कैवल्यधाम योग संस्थेचे प्राध्यापक श्री रणजीत सिंग भोगाल यांनी उपस्थितांचे आभार मानले. कुमारी अन्विता दीक्षित यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. कार्यक्रमाची सांगता शांतीपाठाने करण्यात आली.

# सैनिकी मुलांच्या वसतिगृहात तात्पुरत्या स्वरूपात अशासकीय पदभरती

**पुणे । प्रतिनिधी**

पुणे शहरात पर्वती येथील सैनिकी मुलांच्या वसतिगृहात सहायक वसतिगृह अधीक्षक पदासाठी इच्छुक व पात्र माजी सैनिक पत्नी, विधवा पत्नी व इतर महिला नागरीक यांनी ७ नोव्हेंबर पर्यंत आपले अर्ज सैनिकी मुलींचे वसतिगृह येथे सादर करावेत, असे जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयाने कळविले आहे.



पुणे शहरात पर्वती येथील सैनिकी मुलांच्या वसतिगृहात सहायक वसतिगृह अधीक्षक हे तात्पुरत्या स्वरूपातील अशासकीय एक पद भरण्याकरिता भरती प्रक्रिया राबविण्याचे प्रस्तावित आहे. निवड झालेल्या उमेदवाराला २४ हजार ८९ रुपये इतके मानधन देण्यात येणार आहे.

अधिक माहितीसाठी वसतिगृह अधीक्षक शेख अब्दुल यांना भ्रमणध्वनी क्रमांक ७०२०४१०९५४ वर उमेदवारांनी संपर्क साधावा, असे आवाहनही जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी लेफ्टनंट कर्नल हंगे एस. डी. (निवृत्त) यांनी केले आहे.

# दिवाळी सणाच्या पार्श्वभूमीवर अधिकचे भाडे आकारणी करणाऱ्या खासगी वाहतुकदारांविरुद्ध तक्रारी करण्याचे आवाहन

**पुणे । प्रतिनिधी**

दिवाळी सणाच्या पार्श्वभूमीवर खासगी वाहतूकदारांनी प्रवाशाकडून निर्धारित केलेल्या भाड्यापेक्षा अधिक भाडे आकारणी केल्यास प्रवाशांनी पिंपरी-चिंचवड उप प्रादेशिक परिवहन कायार्लयाच्या mh14prosecutiongmail.co या ईमेल पत्त्यावर तक्रारी किंवा पुरावे सादर करण्याचे आवाहन करण्यात येत आहे.

खाजगी प्रवासी बसेसची सेवा पुरविणारे वाहतूकदारांनी संबंधित मार्गावर महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्यावतीने वाहतूक सेवेकरीता आकारण्यात येणाऱ्या भाड्याच्या कमाल दीडपटपर्यंत भाडे आकारता येईल. त्यापेक्षा अधिक भाडे आकारणी करणाऱ्या खासगी बसेसवर मोटार वाहन कायद्यांतर्गत कारवाई करण्याचे आदेश मोटार वाहन निरीक्षक यांना देण्यात आलेले आहेत.

अधिक भाडे आकारल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्यास किंवा आढळून आल्यास अशा वाहतूक पुरवठादारांवर मोटार वाहन कायद्याच्या विविध कलमांतर्गत खटला दाखल करण्यात येणार आहे, अशी माहिती पिंपरी-चिंचवडचे उप प्रादेशिक परिवहन अधिकारी अतुल आदे यांनी दिली आहे.

# कुणबीसाठी अर्ज करणाऱ्यांची संख्या वाढली

**पुणे । प्रतिनिधी**

मराठा समाजाला कुणबी प्रमाणपत्र मिळावे, यासाठी राज्यभर वातावरण तापले असल्याने मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या सूचनेनुसार कुणबी प्रमाणपत्रांचे वाटप करावे, असे आदेश महसूल प्रशासनाला दिले आहेत. या आदेशानंतर कुणबीसाठी अर्ज करणायांची संख्या वाढली असून, खेड तालुक्यात दोन दिवसांत २७ जणांनी कुणबी दाखले मिळण्यासाठी अर्ज केले आहेत. अर्जदाराने अर्ज केल्यानंतर महसूल पुरावे संबंधित यंत्रणेने शोधून कुणबी दाखले द्यायचे आहेत.




शासनाच्या आदेशपूर्वीदेखील पुणे जिल्ह्यात सरसकट कुणबी दाखल्याचे वाटप करण्यात येत होते. यामध्ये प्रामुख्याने राजकारणी लोक व शैक्षणिक कारणांसाठी दाखले काढण्याचे प्रमाण अधिक होते. परंतु, यासाठी आवश्यक असलेले पुरावे गोळा करणे व दाखले मिळवणे मोठे कठीण काम होते. यामध्येदेखील 'एजंटगिरी'मुळे मराठा समाजाला कुणबी दाखला मिळण्यासाठी मोठा भुर्दंड सहन करावा लागतो. या पार्श्वभूमीवर आता शासनाने केवळ अर्ज केल्यानंतर प्रशासनानेच आवश्यक पुरावे शोधून दाखले द्यायचे आहेत.

# पुणे विद्यापीठात दोन गट भिडले; कार्यकर्त्यांमध्ये तुफान राडा

**पुणे । प्रतिनिधी**

पुणे विद्यापीठात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या विरोधात आक्षेपार्ह लिखाण केल्याने भाजप युवा मोर्चा आणि एसएफआय या दोन संघटना एकमेकांच्या विरोधात भिडले आहेत. दोन गटांमध्ये बाचाबाचीदेखील झाल्याची माहिती आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याविरोधात आक्षेपार्ह मजकूर लिहिण्यात आला होता. त्यामुळे भाजपकडून आज आंदोलन सुरु होतं. दरम्यान आंदोलनावेळी दोन गटात गोंधळ झाला आहे. या घटनेमुळे पुणे विद्यापीठात पोलीस बंदोबस्त वाढवण्यात आला आहे.



अधिक माहिती अशी की, पुणे विद्यापीठात नरेंद्र मोदी यांच्याविषयी आक्षेपार्ह मजकूर लिहिल्यामुळे भाजप आणि एसएफआयचे कार्यकर्ते आज आमने-सामने आले. कार्यकर्त्यांमध्ये शाब्दिक बाचाबाची देखील झाली. डाव्या संघटनांचा लाल झेंडा पायाखाली तुडवून भाजप युवा मोर्चाकडून निषेध व्यक्त केला. यावेळी युवा मोर्चाच्या कार्यकर्त्याकडून जोरदार घोषणाबाजी करण्यात आली. तर डाव्या संघटनांकडूनही इंकलाब जिंदा बाद च्या घोषणा देण्यात आल्या.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात एक तारखेला दोन विद्यार्थी संघटनांच्या कार्यकर्त्यांमध्ये हाणामारी झाली होती. या घटनेनंतर पुन्हा काल रात्री विद्यापीठातील आठ नंबर होस्टेलमधील भिंतीवर पंतप्रधान नरेंद्र मोदीं यांच्याविषयी आक्षेपार्ह लिखाण केलं होत. या लिखाणाचे फोटो सोशल मीडियावर व्हायरल झाले होते. संबधित आक्षेपार्ह मजकूर कोणी लिहिला याचा शोध विद्यापीठाकडून सुरु होते. दरम्यान मोदी यांच्याबद्दल मजकूर लिहिल्याने पुणे भाजपच्या वतीने आंदोलन करण्यात आले.

# केळी उत्पादक शेतकऱ्यांना पीकविमा भरण्यासाठी मुदतवाढ

**पुणे । प्रतिनिधी**

प्रधानमंत्री पीक विमा योजनेंतर्गत फळ पीक विमा योजनेत केळी पिकाचा विमा भरुन योजनेत सहभागी होण्यासाठी शेतकऱ्यांना आज दि.३ नोव्हेंबरपर्यंत मुदतवाढ देण्यात आली असल्याचे कृषी विभागाने कळविले आहे.

प्रधानमंत्री पीक विमा योजनेंतर्गत अंतर्गत हवामान आधारित फळ पिक विमा योजनेमध्ये आंबिया बहार २०२३-२४ साठी केळी पिकाचा विमा भरण्याची अंतिम मुदत ३१ ऑक्टोबर २०२३ ही होती. ३१ ऑक्टोबर २०२३ पर्यंत ४५ हजार ७३१ अर्जदारांनी केळीसाठी विमा योजनेत सहभाग घेतलेला आहे. तथापि, काही तांत्रिक अडचणींमुळे काही केळी उत्पादक शेतकरी वेळेत या योजनेत सहभागी होऊ शकले नाहीत.

अशा शेतकऱ्यांना योजनेत सहभागी होता यावे यासाठी मुदतवाढ देण्याची विनंती राज्य सरकारने केंद्र सरकारला केली होती. त्यानुसार केंद्र शासनाने ही मुदतवाढ दिल्याचे राज्याच्या कृषी आयुक्तालयाने कळविले आहे.

# सेन्सर गॉगलची नितीन गडकरींकडून दखल

**पुणे । प्रतिनिधी**

अवसरी खुर्द (ता. आंबेगाव) येथील न्यू ऑक्सफर्ड इंटरनॅशनलच्या इयता आठवीच्या विद्यार्थ्यांने रस्ते अपघात टाळण्यासाठी बनविलेल्या सेन्सर गॉगलची दखल केंद्रीय रस्ते वाहतूकमंत्री नितीन गडकरी यांनी घेतली आहे. त्यांनी या विद्यार्थ्याचे कौतुक केले . महामार्ग तसेच इतर रस्त्यांवरील अपघाताच्या विविध कारणांमध्ये चालकाला डुलकी लागणे हे प्रमुख कारण आहे. असे अपघात टाळण्यासाठी न्यू ऑक्सफर्ड इंटरनॅशनल स्कूलमध्ये इयत्ता आठवीत शिकत असलेल्या आयुष घोलपने सेंसर गॉगल तयार केला आहे.



या गॉगलबाबत भीमाशंकर सहकारी साखर कारखान्याचे माजी अध्यक्ष देवदत्त निकम यांनी नाशिक राष्ट्रीय महामार्गाचे समन्वयक दिलीप मेदगे यांच्याशी चर्चा केली. त्यानुसार केंद्रीय रस्ते वाहतूकमंत्री नितीन गडकरी यांची दिल्ली येथील निवासस्थानी भेट घेतली. आयुष घोलप या विद्यार्थ्याने तयार केलेल्या सेन्सर गॉगलची माहिती त्यांना दिली. सदर गॉगल हा कमी दरामध्ये चालकांसाठी उपलब्ध करण्यासाठी व यातील काही तांत्रिक बाबींची मदत करण्याची सूचना गडकरी यांनी अधिकार्यांना दिल्या. या वेळी शाळेच्या संस्थापिका स्वाती मुळे, सेन्सर गॉगल बनविणार्या आयुषचे वडील अमोल घोलप व इतर शिक्षक उपस्थित होते. नितीन गडकरी यांनी आयुष घोलप याला प्रोत्साहित केले.

# दुष्काळी आदेशाची अंमलबजावणी करा ; शासनाचे निर्देश

**पुणे । प्रतिनिधी**

राज्य शासनाने राज्यातील ४० तालुके दुष्काळग्रस्त जाहीर केले असून, त्यात दौंड तालुका मध्यम स्वरूपाचा दुष्काळी असल्याचा समावेश केला आहे. त्यामुळे दौंड तालुक्याला शासनाने जाहीर केलेल्या आदेशाची अंमलबजावणी करण्याचे आदेश तालुका प्रशासन विभागाला दिले आहेत.

यंदा दौंड तालुक्यात पुरेशा प्रमाणात पाऊस न झाल्याने खोर, देऊळगावगाडा, पडवी, कुसेगाव, रोटी, हिंगणीगाडा, वासुंदे, जिरेगाव, कौठडी आदी गावांतील तलाव कोरडे पडले आहेत. तर, विहिरींमधील पाणीसाठ्याने तळ गाठला आहे. पिण्याच्या पाण्याबरोबरच शेतीच्या पाण्याचा प्रश्न गंभीर बनला आहे. पाण्यासाठी वाड्यावस्त्यांवरील नागरिकांना वणवण भटकंती करण्याची वेळ आली आहे. तर, पाळीव जनावरांचा चारा व पाणीप्रश्न तितकाच गंभीर बनत चालला आहे.



पुणे जिल्ह्यातील बारामती व पुरंदर या तालुक्यात गंभीर स्वरूपाचा दुष्काळ म्हणून जाहीर केला आहे. तर, दौंड, शिरूर व इंदापूर हे तीन तालुके मध्यम स्वरूपाचा दुष्काळ म्हणून घोषित केली गेले आहेत. शासनाने दौंड तालुक्याला मध्यम स्वरूपाचा दुष्काळ जाहीर केल्याने जमीन महसुलात सूट, पीक कर्जाचे पुनर्गठन, शेतीशी निगडित कर्जाच्या वसुलीस स्थगिती, कृषिपंपाच्या चालू वीजबिलात ३३.५० टक्के सूट, शालेय/महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या परीक्षा शुल्कात माफी निर्णय, रोहयो अंतर्गत कामाच्या निकषात काही प्रमाणात शिथिलता, आवश्यक तेथे पिण्याचे पाणी पुरविण्यासाठी टँकर, शेतीपंपाची वीज जोडणी खंडित न करणे आदींचा लाभ दौंड तालुक्याला मिळणार असल्याचे स्पष्ट केले आहे. तरी शासनाने खडकवासला कालाव्यातून पाण्याचे आवर्तन सोडून या दुष्काळी गावांतील तलाव भरावेत. तसेच, तातडीने इतर आवश्यक उपाययोजना अमलात आणाव्यात, अशी मागणी ग्रामस्थांकडून केली जात आहे.

# महात्मा फुले महाविद्यालयास 'ए++' मानांकन

**पुणे। प्रतिनिधी**

रयत शिक्षण संस्थेच्या महात्मा फुले महाविद्यालयात विद्यापीठ अनुदान आयोग अंतर्गत नॅककडून दिनांक ३० व ३१ ऑक्टोबर २०२३ रोजी केल्या गेलेल्या चौथ्या मूल्यमापनात 'ए++' मानांकन मिळाले आहे.

सदर बैंक समकक्ष समितीवर अध्यक्ष म्हणून प्रो. विमला येरा मिल्ली (उत्तर प्रदेश), सदस्य म्हणून प्रा. डॉ. सत्यभामा कुलथू (तामिळनाडू) व सदस्य समन्वयक म्हणून प्रो. डोमिनिक डेव्ही डप्पा (कर्नाटक) हे उपस्थित होते.

महाविद्यालयात पदवी पातळीवर कला, वाणिज्य, विज्ञान, बी-व्होक (मास कम्युनिकेशन) या शाखांमध्ये अध्ययनाची सुविधा आहे, तर पद्युत्तर पातळीवर एम. ए. मराठी, हिंदी, इतिहास, अर्थशास्त्र, एम. एस्सी. भूगोल, रसायनशास्त्र, सूक्ष्मजीवशास्त्र, एम. कॉम. या शाखांमध्ये अध्ययनाची सुविधा आहे. पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या विचार व कार्याचा वसा व वारसा हे महाविद्यालय गेल्या ४० वर्षापासून चालवित आहे.

राज्य, राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय चर्चासत्रे, कोर्सेसच्या माध्यमातून उद्योग-व्यावसायिक बनविण्यासाठीचे उपक्रम, संशोधनास चालना मिळण्यासाठी चर्चासत्रे, कार्यशाळांचे आयोजन, विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेला वाव मिळवून देण्यासाठी 'आविष्कार'सारख्या उपक्रमात विद्यार्थ्यांना संधी, राष्ट्रीय सेवा योजना, राष्ट्रीय छात्र सेना, कर्मवीर भाऊराव पाटील कमवा व शिका योजना, पोलीस भरतीपूर्व प्रशिक्षण, राज्य व केंद्रीय लोकसेवा आयोगामार्फत प्रशासकीय अधिकारी म्हणून लोकसेवक बनविण्यासाठी स्पर्धा परीक्षा केंद्र, हे आणि यासारखे विविध उपक्रम यशस्वीपणे राबविले जातात.

विद्यार्थ्यांसाठी वक्तृत्व, निबंध, रांगोळी, चित्रकला, नृत्य, नाट्य, संगीत यासारख्या विविध स्पर्धा घेऊन विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास घडविण्यासाठी महाविद्यालय सतत प्रयत्नशील असते त्यात मानाचा तुरा म्हणून महाविद्यालयास चौथ्या मूल्यमापन व मूल्यांकन प्रक्रियेत 'ए++' (सी.जी.पी.ए. ३.६१) मानांकन मिळाले आहे.




महाविद्यालयाचा हा चढता आलेख राखण्यात प्राचार्य डॉ. अशोकराव भोईटे, प्राचार्य डॉ. पांडुरंग गायकवाड यांनी बहुमोल कष्ट घेतले. ऑगस्ट २०२२ मध्ये प्राचार्य डॉ. कैलास जगदाळे महाविद्यालयात रुजू झाल्यानंतर खऱ्या अर्थाने कार्यास गती मिळाली. त्यांच्या निवृत्तीनंतर प्राचार्य प्रोफेसर डॉ. माधव सरोदे यांनी ती धुरा समर्थपणे सांभाळली व महाविद्यालयास सर्वोच्च असलेले हे 'ए++' मानांकन मिळवून देण्यात सिंहाचा वाटा उचलला,

या मानांकनात रयत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष मा. शरदरावजी पवारसाहेब, संघटक डॉ. अनिल पाटील, चेअरमन मा. चंद्रकांत दळवी, सचिव मा. विकास देशमुख, सहसचिव मा. प्राचार्य डॉ. ज्ञानदेव म्हस्के, ऑडिटर प्राचार्य डॉ. शिवलिंग मेनकुदळे, संस्थेचे विविध पदाधिकारी, महाविद्यालय विकास समितीचे चेअरमन मा.

संजोगजी वाघेरे पाटील, माजी विद्यार्थी संघटनेचे अध्यक्ष विशाल मासुळकर, बाळासाहेब वाघेरे, संघटनेचे सर्व पदाधिकारी, अंतर्गत गुणवत्ता कक्षाचे समन्वयक डॉ. नीलकंठ डहाळे, उपप्राचार्य प्रा. शहाजी मोरे, डॉ.मृणालिनी शेखर, प्रा. अनिकेत खत्री, प्राध्यापक, आजी विद्यार्थी, माजी विद्यार्थी, पालक, शिक्षकेतर सेवक या सर्वांचे अनमोल सहकार्य मिळाले. या सर्वांच्या परिश्रमातून महाविद्यालयास मिळालेल्या 'ए++' मानांकनाबद्दल समाजाच्या विविध स्तरातून प्राचार्य डॉ. माधव सरोदे यांचे अभिनंदन होत आहे.